■
संपादक
रमेश पानसे
■
कार्यकारी संपादक
डॉ. वैखरी वैद्य
■
व्यवस्थापकीय संपादक
प्रसाद मणेरीकर
■
संचालक
अदिती नातू
■
कार्यकारी संचालक
अजित मंडलिक
■
संपादक मंडळ
डॉ. द. ना. धनागरे,
आशिष पेंडसे
डॉ. हेमचंद्र प्रधान,
विवेक सावंत
■
सल्लागार मंडळ
डॉ. राम ताकवले ,
डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर, प्रमोद लेले
दीपक घैसास,
डॉ. चंद्रहास देशपांडे
अच्युत गोडबोले
■
आतील चित्रे
डॉ. अपर्णा कुलकर्णी
■
सजावट व मांडणी
राजश्री जाधव
■
मुद्रितशोधन
मिलिंद बोरकर

ग्राममंगल
INNOVATIONS IN LEARNING
शिक्षणवेध
वर्ष: सातवे । अंक सातवा । मार्च २०१७
ISBN : 978-81-927549-0-1

# अ नु क्र म णि का

संपादकीय / ५
मूल्यांविषयी नवा विचार / रमेश पानसे / ७
आदिवासींच्या शिक्षणाची वाट / संजय गणपथी /१५
गट प्रगती / शुभदा अघोर / २०
स्वप्नांचे ओझे / कल्पना डेव्हिड बन्सोड / २३
रचना / वैशाली गेडाम / २७
हा खेळ संकल्पनांचा / प्रभाकर खाडिलकर / ३३
माझे नवे शिक्षण / नीलम संकपाळ / ४०
ग्राममंगलवार्ता / ४३
सर, मी जात खोडली / सोमनाथ वाळके / ४५

## संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार

**पुणे कार्यालय**
गांधी भवन परिसर, अंध शाळेशेजारी, कोथरूड, पुणे - ४११०३८
संवाद : ०२० -२५३८६६८७ Email shikshanvedh@grammangal.org,
**मुंबई कार्यालय**
अजित मंडलिक, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७.
संवाद : ०९८६९०४९८४९

हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी
इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून
त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

# आवाहन

गेले काही महिने, शिक्षणवेध मासिकातून, सैद्धांतिक आणि व्यावहारिक रचनावादावरचे वाङ्‌मय आवर्जून प्रसिद्ध करण्यात आले आहे. याही अंकामध्ये प्रत्यक्ष रचनावादी वर्गात काम करणाऱ्या शिक्षकांचे प्रभावी अनुभव प्रसिद्ध करण्यात आले आहेत. हे अनुभव विद्यार्थ्यांचे शिकणे कसे चालते, शिक्षकांचे-पालकांचे कर्तव्य काय आहे, या बाबींतले आहेत. रचनावादाची कांस आपापल्या वर्गांमधून धरणाऱ्या शिक्षकांना हे अनुभव केवळ आश्चर्याचे व आनंदाचेच वाटतील असे नाही तर आपल्या कल्पनांना धुमारे फुटण्यासाठी, असे अनुभव, निश्चितच पाया पुरवतील. शिक्षकांनी वाचनाबरोबरच या व अशा विषयांवर चर्चा करायला हव्यात. अशा चर्चा, शिक्षणविषयक प्रयोगांना, बौद्धिक पाया पुरवतील.

वास्तविक रचनावादावरील लेख, शिक्षणवेधमधून आवर्जून छापताना अपेक्षा अशी आहे की, शिक्षक-पालक-अन्य वाचक यांचे 'शिक्षणवेध' हे एक कायमस्वरूपी व्यासपीठ बनावे. बौद्धिक चर्चा घडत राहिल्याने शिक्षणक्षेत्र जागते राहते; याचबरोबर समाजसुद्धा वैचारिकतेच्या आवश्यक अशा दिशेने काहीसा वळतो. आमचे वाचकांना असे आवाहन आहे की त्यांनी, यांमधील वाङ्‌मयाला उचित प्रतिसाद द्यावा, आपली मते मांडावीत, स्वत: छोटे-मोठे लेखन करावे आणि शैक्षणिक क्षेत्रात घुसळण होण्यास हातभार लावावा.

प्रतिसादाच्या अपेक्षेत...



**रमेश पानसे**

संपादक




# मुलांना शाळेतील जीवनात जखडून ठेवू नका, त्यांना जीवनातील शाळेत मुक्तपणे विहरू द्या

शैशव, बाल्य आणि कौमार्य हे बालकांच्या आयुष्यातील नैसर्गिकरीत्या विकासाचे, विविधांगी विकासाचे व विकासाशी जोडून येणाऱ्या आनंदाचे कालावधी आहेत.

त्यामुळे,

पालकांची पहिली आणि अखेरची जबाबदारी असते, ती बालकांना शक्य तेवढी शारीरिक नि मानसिक मुक्तता ठेवण्याची. अशी मुक्ततेची संधी हा जगण्याच्या हक्काइतकाच बालकांचा मूलभूत हक्क आहे.

व्यवहारात मात्र बालकांच्या अगदी लहान वयापासून त्यांच्या शिक्षणाविषयी पालक खूप जागरूक असल्यामुळे बालकांच्या शिक्षणाचा विचार सुरू करतात.

मात्र,

'शिक्षण म्हणजे शाळा' असेच समीकरण त्यांच्या मनात दृढ असल्यामुळे- ते शाळांचा- चांगल्या शाळांचा असाच फक्त विचार करीत राहतात. मुलांचे वय जितके लहान तितके मुलांचे शाळेबाहेरचे नैसर्गिकतेने शिक्षण अधिक होत असते. वाढत्या कुमारवयात, बाह्य परिसरातील जीवन अनुभवण्याच्या संधी विद्यार्थ्यांना जाणून-बुजून द्याव्या लागतात.

औपचारिक शिक्षणाची काहीशी दिशा देणे, थोडासा सराव देणे, हेच खरे तर शाळेचे काम असते. शाळेतील शिक्षण हा मुलांच्या एकूण शिक्षणाचा एक अगदी छोटासा भाग असतो.

पण,

प्रत्येक पालक आणि एकूण पालकांचा समाज असे मानतो की- 'शाळेत होते तेच शिक्षण'! त्यामुळे ते शाळेतच मुलांना जास्तीत जास्त वेळ ठेवण्याचा प्रयत्न करतात. शाळेचा अभ्यासच घरी करायला लावतात आणि या अभ्यासासाठी शाळेबाहेरच्या वेळात शिकविण्याही लावतात. शाळेने मात्र लेखन-वाचनाचा गृहपाठ मुलांना देऊ नये. पालकांनी घराचे क्षेत्र शाळाबाह्य शिक्षणासाठी राखून ठेवावे.

शाळा आणि शाळेचा अभ्यास यांबाबत मुलांच्या मनात कंटाळ्याची, भीतीची, निरर्थकतेची आणि आपल्यावर सक्ती होत असल्याची भावना निर्माण होत असते. शिवाय सदा सर्वकाळ जखडल्याची, बंदिस्ततेची जाणीव त्यांना सतत भेडसावत असते.

म्हणून-

मुलांना शाळा नकोशी वाटते; अभ्यास नकोसा वाटतो. तरीही शिक्षक व पालक समाज फार मोठी बळजबरी मुलांवर करीतच राहतो; सातत्याने करीत राहतो. आपल्या बाजारी कल्पनांमुळे-स्वप्नांमुळे बालकांचे बालपण, बालकांच्या वाढण्यातली नैसर्गिकता, स्वयंविकासातला आनंदच हिरावून घेतो. शाळा, शाळेचा अभ्यास या गोष्टी मुलांना अशा कोणत्या गोष्टी देत नाहीत की, ज्या जीवनात आवश्यक आहेत? अशा गोष्टींची यादी मोठी होईल. शाळा मुलांना आपणहून शिकण्याची सवय देत नाही, शोध घ्यायला शिकवत नाही; तर समवयस्कांकडून शिकण्याची संधी देत नाही, सहकाराची भावना जोपासत नाही. शाळा मुलांना आत्मविश्वासही देत नाही, सहसंवेदना-सहानुभूती देत नाही. त्यामुळे मुले एकट्याने, स्वत:च्या पायांवर जिद्दीने नि ताठपणे उभी राहत नाहीत आणि सहकाराने समाजही घडवू शकत नाहीत. स्वत:बरोबर समाजाचा नि समाजाबरोबर स्वत:चा विकास साधू शकत नाही

शाळा मुलांना घाम फुटेस्तोवर दणादण खेळू देत नाहीत, खेळातून मिळणारा निखळ नैसर्गिक आनंद मिळवू देत नाहीत. खेळांतून निरोगी शरीर घडविण्याची संधी देत नाहीत आणि खेळांतून साधणारा बौद्धिक नि भावनिक विकासही घडू देत नाही.

फक्त-

शाळा केवळ स्पर्धेसाठी थोडी मुले तयार करतात. मुलांकरवी शाळेला बक्षिसे मिळवून देतात. त्यातून 'बक्षिसांकरता खेळ', 'स्पर्धेसाठी खेळ' या घातक हेतूंची निर्मिती करतात. खेळासाठी खेळ, आनंदासाठी खेळ, शारीरिक नि बौद्धिक विकासासाठी खेळ, सर्वांसाठी खेळ- या निखळ हेतूंपासून दूर जातात.

शाळा मुलांना अभ्यासाच्या जोखडाखाली सतत बांधून ठेवतात. फक्त परीक्षांसाठी अभ्यास म्हणजेच परीक्षेपुरताच अभ्यास करायला लावतात. परीक्षांतील गुण म्हणजेच यश, असे मानायला भाग पाडतात. ठरावीक विषयांच्या पलीकडे जाण्याचे मार्गच बंद करून ठेवतात.

यामुळे-

मुले जीवनातील आणि जीवनासाठी लागणाऱ्या विविध अनुभवांपासून वंचित राहतात. मुलांचा आपल्या अनुभवांकरवी आपल्या ज्ञानाची रचना करण्याचा, ज्ञानवाढीचा मार्गच बंद करून ठेवतात. मुले अनेक अंगांनी वाढायची राहूनच जातात. मुलांच्या कित्येक बुद्धिमत्ता वाढविण्याऐवजी खुंटविल्या जातात.

पालकांनी अधिक जागरूक व्हावे. 'शाळा म्हणजे शिक्षण' हे गृहीत मनातून काढून टाकावे. शाळेबाहेरील शिक्षणाच्या संधींचा शोध घ्यावा. शाळेच्या अभ्यासाला कमीत कमी वेळ देऊन शाळेबाहेरच्या अनुभवांतून शिक्षण पुरविण्याला अधिक वेळ द्यावा. आपल्या मुलांना शाळेमधील जीवनात जखडून व ठेवता, जीवनातील शाळेत मुक्तपणे विहरू द्यावे. मुलांच्या विकासाची हीच वाट त्यांना यशाकडे नेणारी वाट आहे, हे लक्षात घ्यावे.

**-संपादक**

**विचारमंथन**

**रमेश पानसे**

# मूल्यांविषयी नवा विचार

माणसाचे मूल हे आईच्या पोटातून जन्माला येत असते, जन्मानंतरचा बराच काळ ते परावलंबी असते आणि लहान मुला-मुलीचे प्रौढात रूपांतर होण्यासाठी अन्य व्यक्तींची मदत लागत असते. ह्या तीनही घटना माणसाचे सामाजिकत्व सिद्ध करतात. माणूस हा एक सामाजिक प्राणी आहे; त्याचे सारे आयुष्य समाजाशी जोडलेले आहे. आपण आपल्या वेगवेगळ्या गरजांसाठी समाजातील व्यक्ती व संस्थांवर जन्मभर अवलंबून असतो आणि त्याच वेळी आपण, आपल्या कार्यक्रमांतून कुणा ना कुणाच्या काही गरजाही भागवत असतो. अशा वेळी जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे समाजाशी बांधलेले नाते कुणासही बाधित न होता अबाधित राहावे यासाठी वागणुकीचे काही संकेत समाज विकसित करीत असतो. या समाजसंकेतांना 'मूल्ये' म्हणून संबोधिले जाते.

मूल्ये म्हणजे समाजनिर्मित असे, इतरांना हितकारक ठरतील असे माणसाच्या वागणुकीचे नितीनियम होय. हे नीतिनियम समाजात निर्माण झालेले व प्रसृत झालेले या अर्थाने सामाजिक असतात; तर ते प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन व्यवहारात अंगीकारायचे असतात, या अर्थाने ते 'व्यक्तिगत'ही असतात. एकाच वेळी सामाजिक व व्यक्तिगत असणाऱ्या या नैतिक मूल्यांना आपण 'मानवी मूल्ये' म्हणून संबोधू शकू.

ज्यांना आपण 'मूल्ये' म्हणू, त्यांचे मुख्य वैशिष्ट्यच मुळी हे असते की-ही मानवी मूल्ये असतात. माणसा-माणसांमधील परस्परसंबंध परस्परांना सोईस्कर नि हितकारक असावेत, असाच मुळी मूल्ये निर्माण करण्यामागील हेतू असतो. मानवी जीवनच परस्परांच्या अस्तित्वाने सुकर व्हावे, असा मूल्यांचे प्रत्येकाने पालन करण्यामागे हेतू असतो.

नैतिक मूल्यांना मानवी 'मूल्ये' असे आवर्जून म्हणण्याचे कारण असे की, त्यांचा मानवाच्या वास्तव जीवनाशीच केवळ संबंध असतो. माणसाच्या तथाकथित आधिभौतिक जीवनाशी, धर्म या संकल्पनेशी किंवा देव या कल्पनेशी काहीही संबंध नसतो. कदाचित एके काळी- जेव्हा माणसांच्या दैनंदिन जीवनावर तथाकथित धर्माचा विलक्षण पगडा होता, त्या काळी- धर्म हे मानवी मूल्यांची माणसांना ओळख करून देण्याचे एक साधन असेलही. परंतु आजही जेव्हा, मुलांमध्ये मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न, काही लोक, संस्था वा संघटना जाणीवपूर्वक धर्माशी सांगड घालून करू पाहातात; तेव्हा त्यातून फारसे काही निष्पन्न होत नाही. किंबहुना, असे काही करण्याची गरजही नाही. धर्माच्या, देवाच्या, पाप-पुण्याच्या अथवा स्वर्ग-नरकाच्या-मोक्षाच्या कल्पनांशिवाय, त्यांच्या आधाराशिवायच आपण 'मूल्यवान' होऊ शकतो. तसे सामर्थ्य आपल्यात आहे. आपल्याला त्याचा अभिमान वाटला पाहिजे.

माणसाला प्रगत असा मेंदू मिळाला आहे. त्याला विचार करता येतो, त्याला विचार बदलता येतो. असे करण्याची लवचिकताही मेंदू घेऊन आला आहे. माणसाला जसे स्वत:चे हित कळते; तसेच दुसऱ्याचे हित कशात आहे, कशात नाही, हेही कळण्याची क्षमता त्याच्यात आहे. सहकार्याची भावना, सहसंवेदना, सहानुभूती, करुणा ह्याही भावना स्वार्थाइतक्याच मानवी आहेत. मनुष्य जसा भावनांनी निर्णय घेतो, तसाच तो बुद्धीने नि विचारानेही निर्णय घेतो. त्यामुळे माणूस हा माणूस म्हणून नैतिक मूल्यांना अंगीकारून आपली वागणूक ठरवू शकतो, यावर विश्वास ठेवायला हरकत नाही. असा विश्वास राखला की मग मात्र एक माणूस, एक विचारक, एक संवेदनशील माणूस म्हणून मूल्याधारित समाज उभारण्याची जबाबदारी आपल्यावरच येते.

बदल, अनित्यता हेही मूल्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वास्तविक मूल्यांचा विचार करताना आपल्या मनासमोर दीर्घ काळ असतो. पण, दीर्घ काळ म्हणजे अनंत काल नव्हे. मूल्ये ही शाश्वत आहेत, असे मानण्याचेही कारण नाही. मूल्यविचार हा मानवी जीवनाशी जोडलेला आहे. जेव्हा जीवनपद्धतीत, जीवनरचनेत, जीवनाच्या पायाभूत गरजांमध्येच बदल घडून येतात; तेव्हा मूल्यांबाबत फेरविचार करण्याची वेळ येते. उदाहरणार्थ- कोणे एके काळी, सामान्य जीवन बहुतांशी धर्माधिष्ठित होते. घट्ट विणीच्या जातिव्यवस्थेत स्पृश्यास्पृश्यता हेही एक मूल्य म्हणूनच अंगीकारले गेले असेल; परंतु भारतातील आजच्या लोकशाही, लिखित राज्यघटनेच्या जाहीरनाम्याने ते पूर्वीचे मूल्य उखडून टाकले नि समतेच्या मूल्याची प्रतिष्ठापना केली. मध्ययुगीन काळातील गुलामीतील आज्ञाधारकता जाऊन तेथे व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्यास प्रतिष्ठा प्राप्त झाली. आज आपण स्वातंत्र्य, समता, न्यायता, बंधुभाव या मूल्यांना अग्रस्थान दिले आहे. अलीकडेच पर्यावरणाचा महागंभीर प्रश्न उद्‌भवल्यानंतर, आपण निसर्ग-संरक्षण व निसर्ग-संवर्धन या मूल्यांची भर आपल्या जीवनप्रणालीत घातली.

मूल्यांचा प्रवास वागणुकीकडून वागणुकीकडे कसा असतो, हे त्याचे आणखी एक वैशिष्ट्य. आपण अंगीकारण्याची मूल्ये आणि ज्या सांस्कृतिक-सामाजिक चौकटीत आपण राहत असतो ती चौकट ह्यांचा घनिष्ट संबंध असतो. एखाद्या संस्कृतीशी नाळ जुळलेल्या कुटुंबात आपण जन्माला येतो; विशिष्ट अशा पहिल्या भाषेच्या वातावरणात आपण सुरुवातीपासून वावरतो;

आपल्या भाषेतील व्यवहार व पारंपरिक वाङ्मय आणि सामाजिक-सांस्कृतिक रूढी-परंपरा या साऱ्यांनी आपली जडण-घडण होत असते. आपला मेंदू हे सारे स्वीकारायला, आत्मसात करायला उत्सुक व सक्षम असतो. त्याकरिता लागणारी दुसऱ्या व्यक्तीशी, व्यवस्थेशी, वातावरणाशी, वस्तूंशी जुळवून घेण्याची क्षमता घेऊनच मेंदू जन्माला आलेला असतो. त्यासाठी मेंदूमध्ये प्रतिबिंब पेशींचे (mirror neurons) विश्व कार्यरत असते. मानवी मेंदू वातावरणातून ज्ञान व मूल्ये शोषून घेत असतो. प्रौढांकडून मुलांकडे आणि एकाकडून दुसऱ्याकडे असा या गोष्टींचा प्रवाह सतत वाहत असतो. विशेषत: लहान मुलांविषयी बोलायचे तर, प्रौढ जगातील वागणूक मनुकांद्वारे (Memes) मुलांकडून शोषून घेतली जाते. देवा-धर्माचे वेडही असेच घेतले जाते आणि व्यवहार, विचार ते थेट व्यसनांपर्यंतच्या बाबी अशाच आत्मसात होतात.

आजच्या सामाजात मानवी मूल्यांबाबत- म्हणजे मूल्ये अंगीकारणे आणि त्यानुसार वागणूक घडून येणे- काही विस्कळीतपणा, काही घसरण जाणवत असेल तर तो, माणसाच्या निर्णयप्रक्रियेवर आघात करणाऱ्या वातावरणातील बदललेल्या स्थितीचा परिपाक आहे, असे म्हणता येईल. मूल्यव्यवस्थेत परिवर्तन होणे वेगळे आणि घसरण होणे वेगळे. मूल्यपरिवर्तन कालानुसार, गरजांनुसार अपेक्षित अशा प्रकारचे असते; तर मूल्य-घसरण ही समाज वागणुकींतील विकृतींमुळे होत जाते.

आजच्या भारतीय व्यवस्थेचे स्वरूप विविध विसंगतींनी भरलेले आढळते. तंत्रज्ञान-शास्त्रज्ञान यांमधील जागतिक स्तरावरील वेगवान बदलांतून भारताचे अर्थकारण ढवळून निघाले. पैसाप्राप्तीच्या नवनवीन संधी निर्माण होऊन, बाजारपेठा विविध (जागतिक) वस्तूंनी फुलू लागल्या. ज्याप्रमाणे आर्थिक स्तरावर पैशांतून पैसा निर्माण होतो, त्याचप्रमाणे सामाजिक स्तरावर वाढत्या पैशांतून पैशांचे वाढते आकर्षण निर्माण होत जाते. समाज हा 'जीवनासाठी पैसा' मिळविण्याच्या उद्दिष्टाकडून 'पैशांसाठी पैसा' मिळविण्याच्या उद्दिष्टांवर येऊन स्थिरावतो. परिणाम असा आढळून येतो की, ज्या क्षेत्रांत साध्ये काही वेगळी आणि त्यांच्या प्राप्तीचे एक साधन म्हणून पैसा असे होते; त्याऐवजी पैसा हेच साध्य बनून, समाजातील विविध कार्यक्षेत्रे ही पैसाप्राप्तीची साधने म्हणून वापरली जाऊ लागली. म्हणजे आता समाजात साध्ये-साधनांची गल्लत झाली. मात्र याचा परिणाम असा झाला की, माणसांची इतर माणसांशी असलेली सर्वसामान्य वागणूक तसेच माणसांची आपल्या कार्यक्षेत्राशी संबंधित असलेली वागणूक ही पैसा ह्याच एकमेव साध्याने बाधित झाली. यातूनच नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत गेला.

धर्मकारण, राजकारण आणि शिक्षण ही माणसाच्या मनावर, वागणुकीवर व दैनंदिन व्यवहारांवर परिणाम करणारी अत्यंत प्रभावी अशी क्षेत्रे आहेत. या क्षेत्रांमधील घटनांचे परिणाम समाजव्यवहारांवर व समाजव्यवस्थेवर होत असतात. या क्षेत्रांमधील घडणाऱ्या घटना समाजस्वास्थ्य जपणाऱ्या असतील, तर समाजात असलेली मूल्यव्यवस्था टिकून राहील. याउलट, या क्षेत्रांमधल्या घटना समाजस्वास्थ्य बिघडवणाऱ्या असतील तर समाजाच्या मूल्यवस्थेला हादरे बसतील.

आज आापल्या आजूबाजूला असलेली आणि दैनंदिन जीवनाच्या नाड्या धरून ठेवणारी

अशी ही क्षेत्रे असून, ती बऱ्याच प्रमाणात भ्रष्टाचाराने काळवंडलेली आहेत. कोणत्याही सामाजिक क्षेत्रातील भ्रष्टाचार हा दोन प्रकारचा असतो. एक- आपल्या अत्यंत जवळून ओळखीचा असलेला आर्थिक किंवा पैशांतील भ्रष्टाचार; आणि दुसरा असतो- त्या क्षेत्राच्या मूलभूत उद्दिष्टांचेच खच्चीकरण करणारा भ्रष्टाचार. भ्रष्टाचार हा नेहमीच व्यक्तींचे व समाजाचे नुकसान करणारा असतो. पण त्यातही, मूळ उद्दिष्टांनाच हरताळ फासणारा भ्रष्टाचार हा अधिक घातक ठरतो कारण तो साऱ्या क्षेत्राचेच अवमूल्यन करतो.

धर्मकारण हे शेकडो वर्षे माणसाच्या मानेवर भुतासारखे जखडून बसले आहे. त्याने बऱ्याच अंशी माणसाला कमजोर करून ठेवले आहे. आजही माणसांच्या धर्मकारणाने फार मोठ्या प्रमाणात पैसा, वेळ, शारीरिक व बौद्धिक शक्ती आणि आत्मविश्वास यांचा अपव्यय होत असतो. दिवसेंदिवस देव-धर्म-बाबा-महाराज यांचे प्रस्थ वाढते ठेवून समाजाला त्यांच्या नादी लावण्याचे व्यावसायिक निष्ठेने नि कार्यक्षमतेने काम करणारे गट समाजात पसरत चालले आहेत. निरर्थकाचे वेड दुसऱ्यांना प्रयत्नपूर्वक लावणे, हेही भ्रष्टाचाराचेच एक रूप आहे. वास्तविक, एकीकडे धर्मावर-देवावर श्रद्धा ठेवून दुसरीकडे समाजात उपयुक्त काम प्रामाणिकपणे करणारी माणसे असू शकतात. ती धर्माच्या नावाने शक्तिप्रदर्शन करीत नाहीत, की अन्य लोकांना आपल्या दिशेने वळवत नाहीत; धर्म-देव भावना ही ते केवळ वैयक्तिक पातळीवर जपत राहतात. त्याला सामाजिक प्रदर्शनाचे स्वरूप देत नाहीत. पण बऱ्याचदा अशा लोकांची ढाल करून धर्माचे व्यावसायिक आपल्या कृतींचे समर्थन करू पाहतात आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घालतात.

**शाळा जेव्हा सरकारची असते किंवा व्यापक अर्थाने बोलायचे तर- शिक्षण जेव्हा सरकारची जबाबदारी ठरते, तेव्हा प्रचलित लोकशाहीला वेढणारे सर्व राहू-केतू शिक्षणक्षेत्राला आपल्या मुठीत ठेवण्यास सज्ज होतात. शिक्षणक्षेत्रात राजकारण, अर्थकारण व काही प्रमाणात धर्मकारण प्रवेश करते आणि या भ्रष्ट त्रयीच्या युतीने शिक्षणक्षेत्रही प्रदूषित होते. याचाच प्रत्यय आज सार्वत्रिकरीत्या आपण घेत आहोत.**

अलीकडे धर्मकारणात राजकारणाचा समावेश होऊन ते अधिकच दूषित होत चालले आहे. राजकारणाच्या सत्ता- संपादनाच्या हेतूला धर्माच्या नावाने केलेले उत्सव, त्यांचे अवडंबर आणि त्याची प्रसिद्धी-अभिमुखता हे साधनभूत केले जात आहेत. देवभक्तीत मतदार दिसणे हे राजकीय व्यक्तींना स्वत:च्या सोईचे वाटत असले, तरी ते निर्हेतुक धर्मकांड वाढविण्यास कारणीभूत ठरत आहे आणि ह्या दृष्टीने ते समाजास घातक ठरते आहे.

फार पूर्वीपासूनच धार्मिक व्यवहार सांभाळणारे लोक हा आपला पोटा-पाण्याचा व्यवसाय आहे, असे मानूनच तो मनोभावे करीत आले आहेत. एकदा अशा प्रकारे धर्मकारणात अर्थकारण शिरल्यानंतर, आर्थिक गरजांपासून तो आपल्या आर्थिक सत्तेपर्यंत या मंडळीकडून अर्थकारण विस्ताराने जाऊ लागले. त्यासाठी कायमस्वरूपी धर्मकारणाची मक्तेदारी टिकवून ठेवणारी देऊळ नामक संस्थाही अस्तित्वात आली. आता हे अर्थकारण अशा टोकाला पोचले आहे की, फकिराला सोन्याचे मुकुट चढविण्यातही आपण नैतिक दृष्ट्या काही गैर करतो आहोत असे करणाऱ्यांना आणि ते पाहणाऱ्यांनाही वाटत नाही. देवादिकांच्या आर्थिक श्रीमंतीचेच गोडवे गायले जाऊ लागले आहेत. त्यामुळे साहजिकच देव-धर्माची संकल्पनाच मूल्यभ्रष्ट होत चालली आहे. येथे शांती, भक्ती, प्रीती, पावित्र्य या मानवी भावनांच्या वर्धनाच्या मूळ हेतूपासून धर्मकारण ढळणे, हाच या क्षेत्राचा अंगभूत असा भ्रष्टाचार आहे.

आज कदाचित राजकारणातील लोक सोडले, तर राजकारणाला कोणी 'चांगले' म्हणत नाही. चांगले म्हणावे असे फारसे काही आढळतच नाही. राजकारणातील व्यक्ती असोत, त्यांची कामे वा कामांची पद्धती असो, त्यांचे वागणे-निर्णय घेणे असो, वा त्यांची वाढती श्रीमंती असो, या साऱ्यांचाच सर्वसामान्य समाजाला उबग आला आहे. राजकारणातील व्यक्तींच्या समाजहितकर कार्याच्या कर्तृत्वावरच लोक त्यांना चांगले म्हणतात. पण अशी काही परिस्थिती नाही, हे खुद्द राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनाच माहीत झाले आहे. किंबहुना, म्हणूनच समाजासमोर आपणच स्वत:चे गोडवे गाण्याची आणि त्यासाठी हजारो फलक स्वत:च्या छबीसह छापून रस्त्यांवर लावण्याची वेळ त्यांच्यावर आली असावी.

**प्रचलित शिक्षणाचे बंदिस्त स्वरूप मुलांच्या शिकण्याच्या स्वातंत्र्यमूल्यावरच आघात करणारे आहे; तर क्रमिक पुस्तकांच्या कचाट्यात सापडलेले वर्गशिक्षण मुलांचे अनुभवविश्वच संकुचित करीत आहे. परिणामत: सारे शिक्षण मुलांना मुक्तपण देणारे ठरण्याऐवजी मुलांना दडपण देणारे आणि म्हणून ताणपूर्ण झाले आहे. मूल्ये ही जशी वातावरणातून शोषली जातात, तशीच ती मुक्त मनाच्या वातावरणातच उमलतात नि फुलतात. पण असे मूल्यवृद्धीचे वातावरण पुरविण्यास शिक्षणव्यवस्था अपुरी ठरत आहे.**

पूर्वीच्या राजेशाहीच्या काळात फारच थोड्या लोकांना सत्तेच्या खुर्च्यांवर बसता येत असे, पण आजच्या लोकशाहीच्या काळात सत्तेच्या खुर्च्यांची संख्या खूपच वाढली आहे. शिवाय सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्यामुळे तर वरपासून खालपर्यंत अशी राजकीय सत्तेची उतरंड उभी राहिली आहे. पूर्वी एकच राजा असायचा, आता वेगवेगळ्या स्तरांवरचे हजारो राजे निर्माण झाले आहेत.

साहजिकच सर्वच खुर्च्यांसाठी स्पर्धेला ऊत आला आहे. स्पर्धा ही मूलत: विनाशकारी असते. दुसऱ्याशी शत्रुत्व बांधण्यात तिचे वैशिष्ट्य दिसून येते. राजकीय वातावरणातील दूषिततेचे हे एक प्रमुख कारण आहे. स्पर्धा ही नेहमीच स्व-प्राप्तीच्या मूल्यावर उभी असते. लोकहितासाठी स्पर्धा असे तिचे रूप नसते. साहजिकच लोकशाही मूल्यांशी विसंगत असूनही लोकशाहीतील निवडणुकांना स्पर्धेच्या राजकारणाचे गंध लागते. स्पर्धेविना निवडणुका किंवा सहकारावर आधारित अशा निवडणुका- अशी परिस्थिती लोकशाहीला शाश्वत रूप देऊ शकेल असे वाटते. पण हे घडणे कठीण आहे.

राजकीय क्षेत्राला आणखी एका राहूने ग्रासले आहे. तो म्हणजे- 'सत्ता-संपत्तीची युती'. सत्तेसाठी संपत्तीचा म्हणजे पैशांचा वापर करावा लागतो. अलीकडे या खर्चाचे वैध व अवैध असे दोन्ही प्रमाण वाढत चालले आहे. सत्ता मिळविण्यासाठी पैसा गुंतवावा लागतो आणि मग परताव्यासाठी नि त्यावरील लाभासाठी सत्तेचा वापर करून पैसा मिळवावा लागतो, असे एक दुष्टचक्र या युतीने निर्माण केले आहे. पूर्वी राजकीय सत्ता ही सामाजिक कार्याच्या मातीतून उगवत असे, आता ती पैशांच्या झाडावर फुलते. त्यामुळे मुळातच समाजकारणाशी असलेले राजकारणाचे जैव नाते तुटलेले आहे आणि व्यापारीकरणाशी त्याचे लग्न लागले आहे. साहजिकच, सामाजिक मूल्यांऐवजी व्यापारी मूल्यांचाच आढळ तेथे दिसून येतो व यातून आर्थिक भ्रष्टाचार फोफावतो.

राजकारणात सत्तासंपादनात यशस्वी ठरलेल्या व्यक्तींचे मूल्यांच्या अंगाने कधी तरी सविस्तर विश्लेषण होण्याची गरज आहे. वरवर पाहता तरी असे दिसते की- पारंपरिक सोडूनच देऊ पण भारतीय राज्यघटनेने दिलेली स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, आर्थिक व सामाजिक न्याय अशा मूल्यांवर निष्ठा आणि केवळ त्यांवर आधारित अशी निर्णयप्रक्रिया व कृती अभावानेच आढळते. यालाच मी राजकीय क्षेत्राचा अंगभूत भ्रष्टाचार असे म्हणतो.

शिक्षणाचे क्षेत्र हे एके काळी पवित्र समजले जात असे. निदान भारतीय संस्कृतीत तरी शिक्षणक्षेत्राला ज्ञानमंदिराची प्रतिष्ठा लाभलेली होती. शिक्षण हा एक पवित्र, सभ्य असा पेशा मानला जात असे. तो समाजाच्या सहकार्यावर उभा असे. व्यापारी क्षेत्र अथवा राजकीय क्षेत्र ह्यांपासून तो अलग ठेवला जात असे. पूर्वी राजकारणापेक्षा धर्मकारणाशी त्याचे अधिक जवळचे नाते होते. एके काळी समाजाच्या अखत्यारीत असलेले आणि समाजसहकारावर आधारित असलेले शिक्षणक्षेत्र हे ब्रिटिशांनी सरकारच्या अखत्यारीत आणले आणि मग ह्या क्षेत्राचा प्रवास वेगळ्या दिशेने सुरू झाला. शिक्षण सरकारच्या ताब्यात येऊ लागल्यावर पहिली गोष्ट घडून यायला सुरुवात झाली ती त्याची समाजाशी, गावाशी असलेली नाळ तुटू लागली. हल्ली गावात शाळा असते; पण शाळा गावाची नसते. शाळेत गावातलीच मुले जातात; पण शाळेवर हुकूमत सरकारची असते; गाव म्हणते, 'शाळा सरकारची आहे, आमची नाही.' शाळा जेव्हा सरकारची असते किंवा व्यापक अर्थाने बोलायचे तर- शिक्षण जेव्हा सरकारची जबाबदारी ठरते, तेव्हा प्रचलित लोकशाहीला वेढणारे सर्व राहू-केतू शिक्षणक्षेत्राला आपल्या मुठीत ठेवण्यास सज्ज होतात. शिक्षणक्षेत्रात राजकारण, अर्थकारण व काही प्रमाणात धर्मकारण प्रवेश करते आणि या

भ्रष्ट त्रयीच्या युतीने शिक्षणक्षेत्रही प्रदूषित होते. याचाच प्रत्यय आज सार्वत्रिकरीत्या आपण घेत आहोत.

शिक्षण हे पैसानिर्मितीचे साधन आणि पैसा हे शिक्षणविस्ताराचे साधन, असे दुष्टचक्र खासगी शिक्षणव्यवहारात सुरू होऊन खासगी शिक्षणक्षेत्रात तथाकथित 'शिक्षणसम्राट' निर्माण झाले आहेत. त्यांची जबरदस्त हुकूमत शिक्षणक्षेत्राला मूळ संस्कारनिर्मितीच्या हेतूंपासून दूर नेऊन त्याचे अनुचित असे व्यापारीकरण करीत आहे. त्यामुळे एकीकडे सरकारी मक्तेदारीचे अकार्यक्षम क्षेत्र आणि दुसरीकडे पैशाला केंद्रस्थानी ठेवणारे खासगी क्षेत्र- अशा चिमट्यात आपली शिक्षणव्यवस्था अडकली आहे. त्यामुळे शिक्षणात आर्थिक व राजकीय भ्रष्टाचार बोकाळला आहे.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख- विशेषत: मूल्यऱ्हासाच्या संदर्भात केला पाहिजे. तो म्हणजे, प्रत्यक्ष शिक्षणाचे अंतर्गत स्वरूप आणि ज्यांच्याकरवी शिक्षण केले जाते, त्या शिक्षकवर्गाची शैक्षणिक नैतिकता यांचा. प्रचलित शिक्षणाचे बंदिस्त स्वरूप मुलांच्या शिकण्याच्या स्वातंत्र्यमूल्यावरच आघात करणारे आहे; तर क्रमिक पुस्तकांच्या कचाट्यात सापडलेले वर्गशिक्षण मुलांचे अनुभवविश्वच संकुचित करीत आहे. परिणामत: सारे शिक्षण मुलांना मुक्तपण देणारे ठरण्याऐवजी मुलांना दडपण देणारे आणि म्हणून ताणपूर्ण झाले आहे. मूल्ये ही जशी वातावरणातून शोषली जातात, तशीच ती मुक्त मनाच्या वातावरणातच उमलतात नि फुलतात. पण असे मूल्यवृद्धीचे वातावरण पुरविण्यास शिक्षणव्यवस्था अपुरी ठरत आहे.

शिक्षकवर्ग सध्या फार मोठ्या अडचणीत सापडला आहे. एकीकडे तो शासनाचा गुलाम होऊन शैक्षणिक पिळवणूक सहन करीत आहे, तर दुसरीकडे तो खासगी सम्राटांचा सेवक होऊन आर्थिक व नैतिक पिळवणूक सहन करीत आहे. शिक्षकाची स्वयंस्फूर्तता, स्वयंप्रेरणा मारली जात आहे. याहूनही महत्त्वाची गोष्ट अशी की- शिक्षक होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या अनैतिक उचापती आणि शिक्षक झाल्यावर जबाबदारीचे भान सोडण्याची प्रवृत्ती यांमुळे शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची परिपूर्ण जबाबदारी पेलण्यासच असमर्थ ठरत आहे. यालाच मी शिक्षणक्षेत्रातील अंतर्गत नि शैक्षणिक भ्रष्टाचार म्हणून संबोधतो आहे.

जनमानसावर विलक्षण प्रभाव टाकणारी ही तीनही क्षेत्रे अशा प्रकारे मूल्यभ्रष्ट झाल्यामुळे, त्यात शिरणारी नवी पिढी आधीच्या पिढीचे अनुकरण करण्यात मग्न होत आहे. विरोध करण्याची, संघर्ष करण्याची, धोके पत्करण्याची, धमकी देण्याची तिची शक्ती एक तर हरवलेली तरी आहे किंवा ती त्यांच्यात कधी निर्माणच झालेली नाही. हे आपले सामाजिक-सांघिक अपयश आहे. प्रवाहाबरोबर वाहवणाऱ्यांची संख्या वाढतच आहे.

मूल्यऱ्हासाचे हे विश्लेषण त्यावरील उपायांचे सूचन केल्याशिवाय पूर्ण होणार नाही.

मला अजूनही असे वाटते की, कुटुंबा-कुटुंबातून होणारे लहानपणचे सहज शिक्षण आणि शाळा-शाळांतून होणारे औपचारिक शिक्षण ही मूल्यवर्धनाची केंद्रे आहेत. देशबांधणीचे प्रयत्न नव्याने करण्याची वेळ आता आली आहे आणि त्याची सुरुवात खालपासून करायला हवी आहे. त्यासाठी प्राथमिक समाजसंस्था म्हणून कुटुंब आणि दुय्यम समाजसंस्था म्हणून

प्राथमिक शाळा यांच्यात आमूलाग्र बदल घडवून आणण्यावर आपले प्रयत्न केंद्रित व्हायला हवे आहेत.

मूल्यांचाही नव्याने विचार व्हायला हवा आहे. आपण पुढील शे-दिडशे वर्षांच्या समाजजीवनासाठी कोणती मूल्ये साकार करणार आहोत? भावी काळाचा वेध घेऊनच मूल्यांचा विचार करावा लागेल. जर आपल्यापुढे भावी समाजरचनेचे काही स्वप्न असेल, तर मूल्यांची त्या दिशेने आणखी करणे सोपे असते. पण आजच्या घडीला देशासमोर असे काही स्वप्न, अशी काही भावी समाजजीवनाची आदर्शमय-आनंदमय अशी चौकट नाही. त्यामुळे त्याच्या आधारे करता आला असता असा मूल्यमांडणीचा विचार करता येत नाही, ही मला वाटते एक गंभीर अशी विचारमर्यादा आहे.

परंतु, परिस्थिती काही अगदीच बिकट नाही. भारतीय राज्यघटनेच्या प्रणेत्यांनी लिखित घटनेच्या रूपांत, दिलेली दिशा भारतात लोकशाही टिकवून ठेवणारी ठरली आहे. त्यांनी घटनेच्या जाहीरनाम्यात विदित केलेली मूल्ये केवळ कौतुकासाठी नसून प्रत्यक्षपणे अंगीकारण्यासाठी आहेत अशी आपण धारणा ठेवली, तर तीच एक मूल्यचौकट भावी काळाला काहीसा आकार देण्यास समर्थ आहे. न्यायता, स्वातंत्र्य, समानता, एकात्मता आणि बंधुता या मूल्यांमध्ये कालमानानुसार बदलत्या परिस्थितीला अनुषंगून अशी काही भर विचारांती घालणे शक्य आहे. मला वाटते, स्वातंत्र्याला 'विवेक' या मूल्याची जोड देता येईल; स्पर्धात्मकतेच्या विरोधात आणि बंधुत्वाला समाविष्ट करून 'सहकार' या मूल्याची प्रतिष्ठापना करता येईल. कोणतीही भौतिक व वैचारिक निर्मिती ही श्रमाशिवाय होत नाही. निसर्गत:च माणसाचा मेंदू  हा कृतीचा कारक आहे. तसेच, कृतिशीलतेतच मेंदूप्रणीत आनंद दडलेला आहे, हे शास्त्रीय वास्तव लक्षात घेऊन आपल्याला लहानपणापासूनच मुलांकडे 'श्रमानंदा'च्या मूल्याचे अनुभव ठेवावे लागतील. आणखी एका नवमूल्याचा उल्लेख केला पाहिजे. हे मूल्य म्हणजे 'सौंदर्यमूल्य' होय. सौंदर्याचे आकर्षण हे मानवाचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. म्हणूनच माणसाची हजारो  वर्षांपूर्वीची पहिली-वहिली अभिव्यक्ती ही पाषाणावरील चित्रकारितेतून झाली आहे. सौंदर्य हा विषय आज आपण केवळ साहित्यकलासंगीत काळांपुरता सीमित केला आहे; त्याला त्यातून मुक्त करून अधिक व्यापक दृष्टीने पाहिले असता लक्षात येईल की, आजूबाजूच्या परिसरात आणि दैनंदिन व्यवहारांत सौंदर्यनिती व सौंदर्यानुभूती यांना आपण सततच स्थान देत आलो आहोत. माझा असा कयास आहे की- सौंदर्यानुभव घेण्याची क्षमता जर शिक्षणातून निर्माण झाली, तर माणूस अधिक सहिष्णू होईल, त्याला स्वयंशिस्तीचे महत्त्व वाटेल, वागणुकीची समाजहिताची चौकट तो आपलीशी करेल आणि हिंसेपासून दूर राहील.

एका बाजूला सौंदर्यमूल्याने आणि श्रमानंदाने जीवन घडविताना आणखीही एक भान आणावे लागेल. जोवर समाजात नीती-अनीतीचा झगडा चालू आहे, जोवर अर्थकारण-धर्मकारण- राजकारण आणि शिक्षण भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकले आहे; तोवर आपल्याला 'संघर्षमूल्य' आवर्जून आत्मसात करावे लागेल. सत्याच्या, शिवाच्या सौंदर्याच्या आधारावर मानवी  जीवन घडवायचे नि टिकवायचे असेल, तर सहिष्णुतेबरोबरच संघर्षाचेही बीज मानवी मनात रुजले पाहिजे; वेळ येताच टरारून फुलले पाहिजे.

***

प्रासंगिक

संजय गणपथी

# आदिवासींच्या शिक्षणाची वाट

महाराष्ट्रातील आदिवासीबहुल प्रदेशातील ही कथा सर्वच शैक्षणिक घटकांच्या डोळ्यांत अंजन घालणारी ठरावी. राज्यातील एका प्रसिद्ध अभ्यास पत्रकाराने- हेरंब कुलकर्णी यांनी एक पुस्तक लिहिले होते. त्याचे शीर्षक होते- 'शाळा आहे, पण शिक्षण नाही!' या पुस्तकातील वस्तुस्थिती अगदीच सौम्य वाटावी, अशी घटना या कथेत आहे!

या प्रदेशातील दोन शाळा निवडल्या गेल्या. त्या प्राथमिक शाळा नुकत्याच इयत्ता सातवीपासून आठवीपर्यंत विस्तारित झालेल्या आहेत. त्यांची निवड यदृच्छ पद्धतीने (अॅट रँडम) झालेली आहे. त्यांचे माध्यम मराठी असून, सुमारे ९५% ते ९७% विद्यार्थी हे आदिवासी आहेत.

या दोन्ही शाळांतील इयत्ता आठवीच्या वर्गात शैक्षणिक प्रयोग करण्याच्या दृष्टीने एकेक चाचणी (परीक्षा) घेण्यात आली. सर्वच विषयांतील सामान्यज्ञान (जी. के.) हा धागा ठेवून वर्गात अचानक परीक्षा घेतली गेली. चाचणी एकूण ३० गुणांची होती. वेळ एक तासाचा (६० मिनिटे) व एकूण ३० प्रश्न- 'गाळलेल्या जागा योग्य शब्दांनी किंवा आकड्यांनी किंवा आकृतीने भरा' अशा स्वरूपाचे होते. प्राथमिक स्तरावरील सर्व काठिण्य पातळीवरील प्रश्न विचारण्यात आले. या लेखाच्या परिशिष्टामध्ये प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेची प्रत दिलेली आहेच. प्रत्येक शाळेत पटसंख्या ४०च्या वर होती. पण त्या-त्या दिवशी पावसामुळे प्रत्यक्ष हजर विद्यार्थी अनुक्रमे २८ व २२ अशी संख्या होती. या शाळांना आपण क्रमांक देऊ या आणि शाळा क्र.१ व शाळा क्र.२ असे संबोधू. दोन्ही शाळांना समान प्रश्नपत्रिका देण्यात आली. प्रश्नांचे स्वरूप वस्तुनिष्ठ प्रकारचे होते. म्हणजे उत्तर बरोबर असल्यास एक गुण आणि चूक असल्यास शून्य गुण असे तपासले गेले. पुढील तक्ता दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांची प्रगती (की अधोगती!) दर्शविणारा आणि शिक्षणाच्या एकूण खालावत्या दर्जाबद्दल धक्का देणारा आहे. शिक्षणातील अभ्यासू मंडळींनी हे जाणून घ्यावे.

## तक्ता क्र. १ विद्यार्थ्यांच्या गुणांचा तक्ता
## (एकूण गुण ३० पैकी)

| शाळा क्र. १ | | शाळा क्र. २ | |
|---|---|---|---|
| मिळालेले गुण | एवढे गुण मिळालेले विद्यार्थी | मिळालेले गुण | एवढे गुण मिळालेले विद्यार्थी |
| ० | २ | ० | - |
| १ | ५ | १ | १ |
| २ | १२ | २ | २ |
| ३ | ६ | ३ | १ |
| ४ | ० | ४ | ४ |
| ५ | ३ | ५ | ६ |
| ६ | - | ६ | ५ |
| ७ | - | ७ | २ |
| ८ | - | ८ | १ |
| ९ | - | ९ | - |
| १० | - | १० | - |
| | २८ | | २२ |
| निकाल = शून्य टक्के | एकूण विद्यार्थी | निकाल = शून्य टक्के | एकूण विद्यार्थी |

**विश्लेषण :** वाचकहो, या दोन शाळांचे 'रिझल्ट' (मराठीतील प्रतिशब्द निकाल- की निक्काल!) किती योग्य, ते आपणच ठरवा. शाळा क्र. २ म्हणू शकेल की, आमचा निकाल शाळा क्र.१ पेक्षा बरा आहे; पण ते क्षणिक समाधान आहे! कारण दोन्ही शाळांचा निकाल शून्य टक्के आहे. एकही विद्यार्थी ३० गुणांपैकी ८च्या वर गेला नाही. उत्तीर्ण होण्यासाठी १० गुण हवेत. येथील चित्र पाहा आणि स्वस्थ बसा.

'शितावरून भाताची परीक्षा' ही म्हण खरी असेल, तर संख्याशास्त्र बाजूस ठेवा आणि या आदिवासीबहुल भागातील जी दोन शाळांची स्थिती आहे ती पाहता, एकूणच आदिवासी शिक्षणाची काय 'वाट'(!) लागते आहे, ते समजून घ्या.

बरेचसे प्रश्न सोपे असूनही दोन्ही शाळांतील इयत्ता आठवीच्या वर्गातील एकही विद्यार्थी उत्तीर्ण होऊ शकत नाही, याचा अर्थ काय काढावा?

१) प्रश्नपत्रिका कठीण होती काय?

२) परीक्षक कडक होते काय?

३) अचानक चाचणीमुळे विद्यार्थी गोंधळू शकतात काय?

४) प्रश्नांचे अर्थच समजले नाही काय?

५) इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीपर्यंत विद्यार्थी सात वर्षे काय शिकले?

६) इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीपर्यंत या विद्यार्थ्यांना जे शिक्षक (एकूण ७) होते, त्यांनी ७ वर्षे नीट शिकविले नाही काय?

७) सदर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मूल्यांकन नीटपणे वारंवार केले नाही काय?

८) मराठी विषयाबाबत आदिवासी बोलीभाषा वेगळी आणि प्रमाणित (पाठ्यपुस्तकातील) भाषा मुलांना समजण्यास कठीण जाते काय?

९) या विद्यार्थ्यांना केवळ आदिवासी शिक्षकांनीच शिकवावे काय?

१०) बऱ्याचशा विद्यार्थ्यांना स्वत:चे नावदेखील नीट व वाचनीय अक्षरात लिहिता येत नाही असे आढळले, यावरून कोणते अनुमान काढावे?

११) बऱ्याच मुलांना १ ते १० आकडे मराठी आकड्यांत व अक्षरांत तसेच इंग्रजी (रोमन) आकडे व स्पेलिंग येत नाही, असे आढळले. याचा कसा अर्थ लावावा?

१२) बऱ्याच विद्यार्थ्यांना पुढील मराठी वर्णाक्षरे नीट लिहिता येत नाहीत- झः, क्ष, ज्ञ, ष इत्यादी.

१३) मुलांना चित्रकलेचे जुजबी ज्ञानही नाही, असे निरीक्षणातून आढळल्यास काय करावे?

१४) साध्या-साध्या मराठी शब्दांचे इंग्रजी भाषांतर येत नाही व कोणी लिहिलेच तर स्पेलिंग देवनागरीत लिहितात (उदा. चेअर).

इतर काही  वर्गांच्या अशाच चाचण्या घेण्यात आल्यावरची निरीक्षणे अशीच अजब आहेत!

१) इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीपर्यंत वर्गात कोरा आराखडा (नकाशा) दिल्यावर त्यात योग्य ठिकाणी शहरे/स्थाने/प्रदेश दाखवा, असा पाठ दिल्यास तो अजिबात येत नाही! कारण नकाशा भरण्याचा पाठ किंवा सराव पहिली सात वर्षे घेण्यातच आलेला नाही, असे आढळले.

२) रामायण/महाभारत कोणी लिहिले, ते एखादाच अपवाद वगळता  माहीत नाही!

३) तिरंगी झेंड्यातील तीन रंग काय दर्शवितात, ते कानांवरून कधी गेलेलेच दिसले नाही!

४) जवळच्या परिसरातील झाडांची/पाना-फुलांची माहिती नाही, पिंपळाचे पान काढता येत नाही!

५) विज्ञान, भूमिती, भूगोल इत्यादी विषयांतील मूलभूत (बेसिक) संज्ञा व अर्थ माहीत नाही! (उदा.- काटकोन त्रिकोणातील कर्ण)

६) इतिहासातील काही संज्ञा- दुर्ग, गड, बालेकिल्ला, खड्ग, चिलखत इत्यादींचे अर्थच माहीत नाहीत!

७) सैराट सोडून कोणताच मराठी सिनेमा माहीत नाही!

८) प्रसिद्ध कवी व लेखक, नाटककार, कादंबरीकार व त्यांची ग्रंथसंपदा यांच्या कानांवरूनही गेलेली आढळत नाही!

९) बऱ्याच सरकारी/ जि. प. शाळांतून जी शिक्षकमंडळी शिकवीत आहेत, त्यांची मुलं चुकूनही त्यांच्याच शाळेत जात नाहीत; तर ती दूरवरच्या खासगी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांत जातात! जणू त्यांच्या पालकांची (म्हणजे शिक्षकांचीच!) स्वत:च्या शाळेच्या खालावलेल्या दर्जाबद्दल खात्रीच आहे! एवढेच नव्हे, तर हीच शिक्षकमंडळी स्वत:च्या मुलांना अक्षर सुधारण्यासाठी दुरेघी



वह्या, पुस्ती, ॲटलास, कोरे नकाशे आणून देतात; पण आदिवासी विद्यार्थ्यांसाठी तसा प्रयत्न करतात का? शंका आहे! कारण आदिवासी मुलं शिकली काय किंवा न शिकली काय, त्या शिक्षकांचा पगार चालूच राहणार असतो!

**अर्थकारण :** पगारावरून आठवले. यातील एका शाळेतील शिक्षकांना त्यांच्या त्यांच्या अर्हतेप्रमाणे, अनुभवाप्रमाणे पगार निश्चित करण्यात येतो व वाढत जातो. आपण एका शाळेचे उदाहरण घेऊ. तेथील इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीपर्यंत एकूण ७ शिक्षकांना दर महिन्यास सरासरीने समजा २५,००० रुपये पगार आहे. इयत्ता आठवीमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना सदर सात शिक्षकांनी इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत एकेक करीत सात वर्षे शिकविले. त्यावरून सरासरीने अशा शाळेत एकूण पगारावर किती खर्च झाला, ते काढता येईल. तसेच ७ वर्षे या मुलांना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात आले, खिचडी देण्यात आली व झालेला इतरही खर्च काढता येईल!

प्रत्येक वर्गात ३० ते ४० मुलं असावीत असे मानले, तर एकूण सात वर्षांत किती सरकारी (म्हणजे लोकांचाच) पैसा खर्च झाला? आता तो सुमारे किती झाला असावा, ते पाहू.

| | |
|---|---|
| १ शिक्षकाचा दरमहा पगार | = २५,००० |
| ७ शिक्षकांचा दरमहा पगार | = १,७५,००० |
| १ वर्षाचा (१२ महिन्यांचा) पगार | = २१,००,००० |
| ७ वर्षांचा एकूण पगार | = १,४७,००,००० |

सरासरीने ७ वर्षांत पगारावर १ कोटी, ४७ लाख रुपये खर्च झाला. इतर साहित्य, अन्नपुरवठा इत्यादींवर झालेला कमीत कमी खर्च ३ लाख रुपये धरला, तरी सदर इयत्ता आठवीच्या विशिष्ट वर्गावर गेल्या सात वर्षांत एकूण सरकारी खर्च साधारणत: दीड कोटी रुपये झाला! त्यातून जरी खरी चाचणी घेतली, तर सर्वच विद्यार्थी नापास! अशाच १०० शाळा असल्यास १५० कोटी रुपये पाण्यात!! म्हणजे, शाळा या शिक्षकांच्या पगारासाठीच असतात!!

## परिशिष्ट - इयत्ता आठवी : चाचणी परीक्षा

सूचना : प्रश्नापुढे गाळलेल्या ठिकाणी योग्य शब्द किंवा आकडा लिहा.

१) अमेरिका भारताच्या उत्तरेस आहे. चूक की बरोबर?...........

२) सिडनी (ऑस्ट्रेलिया) येथून ध्रुवतारा दक्षिणेस दिसतो; चूक की बरोबर?............

३) भारतात लष्कराच्या शिपायांकडून सुरू झालेल्या स्वातंत्र्यसंग्रामाचे साल : ..........

४) पानिपत येथे मराठ्यांचा पराभव कोणत्या साली झाला? ............

५) राम गणेश गडकरी यांचे प्रसिद्ध नाटक :.......

६) भारताचे राष्ट्रगीत कोणी लिहिले?...........

७) कोणत्या थोर व्यक्तीच्या जन्मतारखेस 'शिक्षकदिन' साजरा करतात?

८) महाराष्ट्रात 'मराठी भाषादिन' कोणत्या तारखेस येतो?..........

९) मुन्शी प्रेमचंद्र यांच्या उपन्यासाचे नाव काय?.....

१०) तुमच्या सर्वांत जवळच्या डोंगराची समुद्रसपाटीपासूनची उंची किती? ..........फूट/मीटर.

११) त्रिकोणाच्या तीनही आंतरकोनांची बेरीज जर दोन काटकोन भरते, तर षटकोनाच्या आंतरकोनांची बेरीज किती काटकोन भरेल?...............

१२) 'आपण सारे भाऊ' या कादंबरीचे लेखक कोण? ................

१३) तुमच्या इयत्ता आठवीच्या वर्गाची लांबी...... फूट व रुंदी ........... फूट

१४) खडकाचे वय कोणत्या साह्याने मोजता येते?...........

१५) चेंडूचे घनफळ काढण्याचे सूत्र?...........

१६) भारताची लोकसंख्या गेल्या १०० वर्षांमध्ये सतत समान वेगाने वाढली आहे. चूक की बरोबर?........

१७) श्रीलंका या शेजारच्या देशाची राजधानी?........

१८) भारतातील सर्वांत उंच ठिकाणावरील विमानतळ?...........

१९) भारतातील भूदान चळवळीचे प्रणेते?........

२०) इटली देशातून भारतात आलेल्या बालशिक्षणतज्ज्ञ?.............

२१) 'लेणे' या शब्दाचे बहुवचन? .............

२२) एकाच सलग पाषाणातून कोरलेले जगप्रसिद्ध व सुंदर लेणे?............

२३) चुनखडकापासून रूपांतर होऊन बनलेला खडक?.........

२४) डोंगर उतारावरून खाली गडगडत येणाऱ्या दगडगोट्यांमागे कोणते बल कार्य करते?..........

२५) तुम्हास माहीत असलेले एखादे संस्कृत सुभाषित लिहा.

२६) भाकरीचा १/३ भाग रंगवा.

२७) दिल्लीहून दौलताबाद (देवगिरी) येथे कोणी राजधानी हलविली? ..........

२८) पुद्दुचेरी (पाँडिचेरी) येथे कोणत्या युरोपीय देशाची वसाहत होती? .........

२९) अंदमान बेटावरील आदिम जमातीचे नाव .......

३०) ठाणे-पालघर जिल्ह्यामध्ये नदीच्या पाण्यात मासेमारी करणाऱ्या आदिवासी जमातीचे नाव?....

***

## नवे शिक्षण

शुभदा अघोर

# गट प्रगती

दहावीची शालान्त परीक्षा म्हणजे मुलापेक्षा आई-बाबा, खरं तर सगळं घरच परीक्षेला बसल्यासारखं वाटतं. याला कर्णबधिर विद्यार्थीही अपवाद नाहीत. त्यात मार्च १७ ला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना डबल टेन्शन, कारण भाषेचा पूर्ण साचा बदललेला. माननीय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी केलेला हा बदल म्हणजे खरोखरच वाखाणण्यासारखा आहे. कारण यात पूर्वीसारखी घोकंपट्टी नाही; तर ज्याला भाषेचे आकलन आहे, तोच हा पेपर सोडवू शकतो. अशा तऱ्हेने भाषेचे महत्त्व ही पटते आणि अभिव्यक्त होण्याकरता भाषेची जाण असणे अत्यंत आवश्यक आहे, हेही समजते.

कर्णबधिरत्व असल्यामुळे या विद्यार्थ्यांना भाषेचे आकलन करताना अनेक अडचणी येतात. एकापेक्षा अधिक भाषा आत्मसात करताना तर अधिकच अडचणीचे होते. मला व माझ्या सात कर्णबधिर विद्यार्थ्यांना हिंदी, इंग्रजी या दोन भाषा व सामान्य गणित हे विषय घेऊन छान पास व्हायचे आहे, हे नक्की. कारण असे विषय घेऊन शालान्त परीक्षेला बसणारी ही पहिलीच बॅच. मग हे शिवधनुष्य एका वर्षांत उत्तम रीतीने पेलण्याचे आम्ही सर्वांनीच ठरवले. एक टीम बनवली. दहावीचे विद्यार्थी यात केंद्रस्थानी आहेत. नंतर मी वर्गशिक्षिका, इतर शिक्षक, इतर व्यावसायिक- अगदी इतर कर्मचारी वर्ग, पालक, विद्यार्थ्यांचे शिकवणीचे शिक्षक किंवा भावंड- जे त्यांचा घरी अभ्यास घेतात, शाळाबाह्य विशेष विषयतज्ज्ञ, इंग्रजीकरिता निर्मलाताई व गणिताकरता रहाळकर सर तसेच मुख्याध्यापक अशी आमची टीम तयार झाली. मुख्याध्यापकांची भूमिका मुलांना प्रोत्साहन देणे, वर्गात अधून-मधून येऊन अभ्यासाचा आढावा घेणे ही ठरली. या सर्वांत संस्थेचा पाठिंबा होताच, कारण इंग्रजी वर्ग संस्थेमार्फत चालतात.

एक वर्ष कॅलेंडरमध्ये जरी दिसले, तरी वास्तवात फक्त काही महिनेच त्यासाठी मिळतात, हे पाहिले आणि तसे विद्यार्थ्यांना व पालकांना जाणवून दिले. अध्यापनाला या शैक्षणिक वर्षात किती दिवस व किती तास मिळतात, ह्याचं एक वेळापत्रक बनवलं अन् त्याप्रमाणे काम चालू ठेवले.

घरी अभ्यास- कोणत्या वेळी काय लिहावे- वाचावे, हे समजावून दिले.



हिंदी, इंग्रजी व सामान्य गणित या नवीन विषयांचे वेगळे वेळापत्रक दिवसाचे बनवले. प्रत्येक महिन्यात येणाऱ्या सुट्ट्यांचीही दखल घेतली. वेळ अपुरा व अभ्यास जास्त असे व्यस्त प्रमाण होते. मग यावर उपाययोजना केली. शनिवारी दोन तास अधिक बोलावून नरेश सरांनी गणित व मी भाषेचा अभ्यास पुढे नेला. शिकवलेल्या भागावर सराव परीक्षा घेणे जरुरीचे होते. कारण मुलांचे आकलन तपासणे आवश्यक असते. पण नवा पॅटर्न असल्याने बाजारात यासाठी काही उपलब्ध नव्हते. मग मी माझ्या माजी विद्यार्थ्यांची मदत घेण्याचे ठरवले. तेजस- जो गेल्याच वर्षी दहावी झाला, त्याच्या पालकांना माझ्या या उपक्रमाची कल्पना दिली. तो रोज दोन तास येऊन मला सराव पेपर टाईप करून देत होता. यामुळे आठवड्यातून दोनदा सराव पेपर होऊ लागले. मला विद्यार्थ्यांच्या आकलनाचा ठोस निकाल मिळू लागला.

इंग्रजी विषयाकरता एका नामवंत इंग्रजी शिक्षकांनी पुस्तक लिहिले आहे, ते शैलजाताईंकडून मिळाले- ज्या एसएससी बोर्डाच्या सदस्य आहेत- त्यावरून सराव होऊ लागला. झेरॉक्स काढून त्यावर परीक्षा होऊ लागल्या. निर्मलाताई या विशेष तज्ज्ञांच्या सतत संपर्कात राहून अभ्यासावर वेळोवेळी चर्चा करून अंदाज घेत होते. हे सगळे करताना संगणक आम्हा सर्वांना खरे वरदान ठरले. तेजसने टाईप केलेले पेपर संगणकात सेव्ह केलेले होते, ते अनेकदा घरचा अभ्यास म्हणूनही देता आले. तसेच, हस्तकलाशिक्षक पिचड सरांनीही सराव पेपर टाईप करून मोलाची मदत केली.

हे सगळे करत असताना वर्गशिक्षक म्हणून माझ्याही मनावर प्रचंड ताण येत होता, कारण वेळ कमी व अभ्यास फार होता. शारीरिक तक्रारी सुरू झाल्या. आजारी पडून खाडे करणे परवडण्यासारखं नव्हतं. मग मी ताण कमी करण्यासाठी प्राणायाम करू लागले. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, मनातले विचार कागदावर उतरवू लागले. शाळेत विद्यार्थ्यांबरोबर मैत्रीचं नातं निर्माण झालं. अनेक समस्या त्यांच्याबरोबर वाटून घेतल्या. मिळून उपाय केले. त्यांना शिकवता-शिकवता मीही खूप काही शिकत होते.

विद्यार्थ्यांच्या शिकवणी शिक्षकांशी संपर्कात होते. त्यांनाही या प्रकल्पामध्ये सामावून

घेतले. पालकसभेत मुलांच्या मातांना त्यांच्या आहाराकडे व अभ्यासाकडे वारंवार लक्ष द्यायला सांगितले. मुलांवरील ताणाची कल्पना त्यांना दिली व तो कमी करण्याचे उपायही सुचवले.

जानेवारी महिना उजाडला आणि मुलांचा ताण अधिक वाढू लागला. मग रोज सकाळी समाजसेविका रिबेलोताई व मी मिळून योगासने व ध्यानधारणा घेऊ लागलो.

विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्याकरता मधल्या सुट्टीत त्यांच्याशी त्यांच्या आवडत्या विषयांवर गप्पा मारू लागले. मुले मनमोकळं बोलत होती, हसत होती.

वर्ग सुरू करताना सकारात्मक विचारांनी वर्ग सुरू करत असे. टीम म्हणजे 'टुगेदर वुई अचिव्ह मोअर' हे मुलांना समजावले. मुलांनाही टीमचे महत्त्व पटले होते, ते त्यांच्या वागण्यातून दिसत होते. मागे पडणाऱ्या आपल्या वर्गमित्राला किंवा मैत्रिणीला स्वत:हून मदत करताना पाहत होते. सगळ्यांचा उद्देश एकच होता- 'शालांन्त परीक्षेत घवघवीत यश!'

मला वाटतं- शिक्षणाची गुणवत्ता वाढवायची असेल, तर शिक्षकांना अनेक घटकांवर काम करावे लागते आणि दिव्यांग विद्यार्थ्यांकरता तर यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. शाळेतील प्रत्येक घटक सजीव तसा निर्जीवही तितकाच महत्त्वाचा असतो.

शेवटी श्री. हरिवंशराय बच्चन यांच्या दोन ओळी आठवतात...

'लहरों से डर कर नौका पार नहीं होती

कोशिश करने वाले की कभी हार नहीं होती'

यशाकडे जाणारा मार्ग खडतर जरी असला, तरी परिश्रमाशिवाय पर्याय नाही. सकारात्मक विचार व झपाटल्यासारखा प्रयत्न असेल, तर यश नक्की मिळणार ही खात्री आहे.

***

वार्षिक वर्गणी रुपये ४००/- (पोस्टेज खर्च रु. ५०/- अतिरिक्त)
किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.
'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि
दरमहा 'शिक्षणवेध'चा अंकही मिळवा.
वर्गणी/रोख/चेक/ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.
मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**
ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड,
पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७

## सुजाण पालकत्व

कल्पना डेव्हिड बन्सोड

# स्वप्नांचे ओझे

स्वप्ने पाहण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तिला आहे. मुलांना, पालकांना आणि समाजालाही. नवीन बाळाची चाहूल लागताच प्रत्येक घरी स्वप्नांचे मनोरे बांधण्याचे काम सुरू होते. घरात मुलांची इवली पावले येताच पालकांची मोठी मोठी स्वप्ने बघणे सुरू होते. मुलांच्या करिअर संबंधी पालकांच्या मनात विचारांचे थैमान सुरू होते. पालक मुलांच्या करिअरवर लागणाऱ्या खर्चाचा हिशोब करू लागतात. हे सुद्धा जन्मणारे मूल, मुलगी आहे की मुलगा यावर अवलंबून असते बरं का... आमचे पालक इतके सुजाण सजग झाले आहेत. मुलगी असेल तर तिच्या लग्नाची चिंता असते. मग लग्न करायचे तर मुलीला चांगले शिकवायला हवे. तिच्याविषयीचे निर्णय तर पालकांनीच घ्यावे हे गृहीतच धरले आहे. शिवाय करिअर म्हणून आपल्या मुलीने कोणते क्षेत्र निवडावे याचेही काही निकष पालकांनी ठरवले असतात. त्यामुळेच तिला चांगला नवरा मिळेल असा ही पालकांनी मनोमन ठरवलेले असते. एकच मुलगी असेल तर तिच्यावर त्यांचा मालकी हक्कच असतो. मुलाचे सुद्धा असेच असते. एकच मुलगा. वंशाचा दिवा. त्याने आपला वंश चालवासा असे स्वप्न पालक एकीकडे पाहतात, तर दुसरीकडे माझेच कार्य किंवा माझाच व्यवसाय मुलाने पुढे न्यावा, असाही अट्टहास पालकांचा असतो. घरात एका पेक्षा जास्त मुलं असली तरी चित्र काही वेगळे नसतेच. चित्र असेच असते, परंतु त्यात थोडी शिथिलता दिसून येते. मात्र मुलांनी आपल्या स्वप्नांची पूर्ती केलीच पाहिजे या मतांवर पालक ठाम असतात. असे नाही झाले तर पालकांचे लंबेचौडे भाषण सुरू होते. विशेष म्हणजे प्रत्येक पालकाचे भाषण सारखेच असते. ''अरे तुला लहानाचं मोठं केलं आम्ही. तुझ्यासाठी किती कष्ट घेतलेत. तुला तिळभर त्रास होऊ दिला नाही. तुझ्यासाठी किती स्वप्नं डोळ्यात होती. आमची स्वप्न तू मोडकळीत काढलीस. तुला काहीच कसं वाटत नाही रे. आमचं नशिबच खोटं आहे. जाऊ दे.' अशी मोठी मोठी वाक्ये वापरून पालक मुलांची भावनिक लुबाडणूक करतात. मुले बिचारी पालकांच्या विचारांना बळी पडतात. एखाद्या मुलाने विरोध केला तर लगेच त्याच्यावर आरोप

प्रत्यारोप केले जातात. त्याला कृतघ्न ठरवले जाते. का? त्याने विद्रोह केला म्हणून... त्याने स्वत:चा हक्क मागितला म्हणून.... की त्याला 'स्व'ची जाणीव झाली म्हणून... पालक म्हणून आपण केव्हापर्यंत बालकांचे मालक बनत राहणार. मुलं ही एक स्वतंत्र व्यक्ती आहे हे कधी आम्ही स्वीकारणार? बालहक्क आम्ही केव्हा समजून घेणार?

मुलांच्या दहावी, बारावीच्या परीक्षा आटोपल्या की पालकांना करिअरचे डोहाळे लागतात. परीक्षेचा निकाल लागेपर्यंत पालकांना काही चैन पडत नसते. प्रत्यक्षात निकाल लागतो तेव्हा तो नेमका कुणाचा निकाल असतो हाच प्रश्न सदैव माझ्या मनात घुसमळतोय. तो निकाल विद्यार्थ्यांचा कमी पालकांचा अधिक असतो. करिअरच्या कल्पनेने पालक झपाटलेले आहेत. करिअरचा सबंध सुखाशी, आनंदाशी आहे याच्याशी कुणाला काहीही देणेघेणे नाही. गडगंज पैसा मिळवणे म्हणजे करिअर हाच एकमेव अर्थ राहिलाय. परंतु सुखासमाधानासाठी करिअर करायचे हे आपण विसरत चाललोय.



सुख हा पैशाचा विषय नाही तर सुख हा मनाचा विषय आहे. आजच्या समाजव्यवस्थेत जीवन चांगले जगता येणे म्हणजे काय? समाजाच्या दृष्टीने चांगले शिक्षण घेऊन लठ्ठ पगाराची नोकरी मिळवणे म्हणजे चांगले जीवन जगता येणे, शिक्षण म्हणजे उत्तम गुण मिळवणे, परीक्षा देणे, नोकरी मिळवणे एवढाच अर्थ मर्यादित राहिलाय. शिकणे म्हणजे फुलणे, उमलणे आणि आपल्या आयुष्याचा सर्वांग, परिपूर्ण आनंद घेता येणे ही व्याख्याच आता लोप पावली आहे. शिक्षकही शाळेत निबंध लिहायला देतात, निबंधाचा विषय असतो, 'मला..... व्हायचंय' यामध्ये मुले लिहितात मला डॉक्टर व्हायचंय, मला इंजिनियर व्हायचंय हे लिहिण्याचे प्रमाण सर्वाधिक असते. काही मोजके विद्यार्थी 'मला शिक्षक व्हायचंय' असे लिहितात. १% विद्यार्थीही मला संगीतकार व्हायचंय, नृत्यांगना व्हायचंय, खेळाडू व्हायचंय असं लिहीत नाहीत. कारण लहानपणापासून त्यांच्या मनावर बिंबवले असते किंवा समाजव्यवहारात मुलांनी ऐकलेले असते, याशिवाय इतर व्यवसाय आहेतच, ज्यामुळे मुले चांगला पैसा कमवू शकतात. परंतु पालकांना पुन्हा प्रतिष्ठेचा प्रश्न येतो, डॉक्टर असलेल्या पालकाला आपला मुलगा शेती करणे कधीच आवडणार नाही. केवळ पालकांना आवडत नाही म्हणून मुलांनी ते करू नये, हा विचारच किती तोकडा वाटतो. ज्या विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळतात, त्यांच्यासाठी शिक्षणाचे महाद्वार खुले असते, किंबहुना अनेक दारे त्यांच्या स्वागतासाठी उभी असतात, परंतु साधारण, कमी गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय? त्यांना समृद्ध जीवन जगण्याचा अधिकार नाही का? अशा मुलांसाठी पालकांचाही अपेक्षाभंग झाल्यामुळे आपुलकी कमी होते. शिवाय त्यांच्यासाठी त्यांना हवी असलेली व्यवसायांची दारे बंद

होतात. अशी मुले भयंकर नैराश्यात असतात. काही सहन करतात. काही मार्ग सोडून वाईट वळणाकडे वळतात. काही अतिशय ताण घेऊन आत्महत्या करतात. याला जबाबदार कोण? याला जबाबदार मुलांना त्यांच्या क्षमतेनुसार शिकण्याचे, क्षेत्र निवडण्याचे स्वातंत्र्यच ज्यांनी नाकारले आहे ते पालक आणि आमची शिक्षणव्यवस्था आहे. मुलांचा चपराशी पासून आय. ए. एस. होण्यापर्यंतचा प्रवास प्रवेश परीक्षेशिवाय पूर्ण होत नाही. खरं तर या प्रवेश परीक्षेचा व त्यांच्या प्रत्यक्ष कामाचा काहीही संबंध नसतो, आय. ए. एस. परीक्षेला विचारलेले किती प्रश्न प्रत्यक्ष काम करताना त्या अधिकाऱ्याला कमी येतात. किंबहुना तेच किंवा त्यासंबंधीत असलेले प्रश्न पुन्हा या अधिकाऱ्यांना विचारले तर किती अधिकारी या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतील? असे असेल तर होणाऱ्या प्रवेश परीक्षेला अर्थच काय? समाजात परीक्षा नावाचे भूत प्रत्येकाच्या मनगुटीवर बसले आहे. त्याचे लोण सर्वत्र पसरले आहे. या सर्व प्रकाराला बालक व पालक दोघेही बळी पडत आहेक. प्रत्येक मुलामध्ये शिकण्याची एक विलक्षण पद्धत असते. निसर्गत:च त्याच्यामध्ये एक प्रभावी वृत्ती असते, परंतु पालक मुलाची क्षमता न ओळखता त्यांच्यावर आपले विचार लादत असतात. मुलांमधील कलागुणांचा व त्याच्या कलाचा विचार कधीच केला जात नाही. मुलांच्या स्वत:च्या आवडी निवडीचा विचारच त्यांच्या मनात येत नाही. मुलांना काही कळत नाही, ती लहान आहेत, त्यांच्या आयुष्याचे निर्णय घेण्याइतपत त्यांची निर्णय क्षमता नाही, असा सूर पालकांकडून नेहमी ऐकू येतो. पालकच जर मुलांवर विश्वास ठेवणार नाहीत तर कोण ठेवणार? आपल्या मुलांसाठी स्वप्न बघणे काही गैर नाही. परंतु आपलीच स्वप्ने त्यांनी पूर्ण करावीच ही पालकांची जिद्द मुलांच्या दृष्टीने घातक आहे. मुलांच्या आयुष्याचे निर्णय मुलांना घेण्याचे अधिकार पालकांनी मुलांना दिले पाहिजेत.

करिअर म्हणजे नेमके काय? याचा अभ्यास पालकांनी करायला हवा. करिअर करणे म्हणजे मोठ्या पदाची नोकरी मिळवणे व उच्चशिक्षित होणे असे नाही तर करिअर म्हणजे मुलांच्या आवडीनुसार शिक्षण घेवून त्यांच्या पुढच्या आयुष्यात व्यावसायिक समाधान मिळणे, तथा त्यात यशस्वी होणे. करिअर मधून मुलांना आनंद घेता आला पाहिजे. त्यासाठी पालकांनी आपले स्वप्नरंजन थांबवले पाहिजे. आपल्या स्वप्नांचे ओझे मुलांना प्रत्येक बाबतीत, परावलंबी करून सोडते. त्यामुळे मुलांची निर्णयक्षमताच नष्ट होते. पुढे मुले स्वत:च्या आयुष्याचे छोटे छोटे निर्णय सुद्धा घेऊ शकत नाहीत. याचा मुलांच्या नोकरी/व्यवसायावर प्रत्यक्ष काम करताना परिणाम होतो. म्हणूनच पालकांनी मुलांना त्यांच्या आवडीनुसार करिअर निवडण्याची संधी दिली पाहिजे.

परंतु कधी कधी असेही दिसून येते की मुलांना स्वातंत्र्य देण्याच्या नावाखाली पालक आपली जबाबदारी झटकतात. मुलांना संघर्ष करण्यासाठी एकटेच सोडून देतात. महत्त्वाचे म्हणजे, ज्यावेळी त्यांना पालकांच्या भक्कम आधाराची गरज असते, परंतु तेव्हा पालक त्यांच्या सोबत नसतात. परिणामी, मुले व्यसनाधीन होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पालकांनी मुलांना केव्हा व कशी मदत करावी हे समजून घेणे गरजेचे आहे. मुलांसाठी पालकांनी पुढील गोष्टी कराव्यात.

- पालकांनी जीवन करिअर याचा नेमका अर्थ जाणून घ्यावा.
- पालकांनी प्रत्येक क्षेत्राविषयी माहिती मिळवावी.

- पालकांचे करिअरविषयीचे अंतिम उद्दिष्ट स्पष्ट असावे, ते अर्थातच मुलांच्यार क्षमतांच्या अंगांनी असावे.
- पालकांनी मुलांच्या भविष्याविषयी स्वप्नरंजन करू नये.
- मुले वयात आली की स्वत:चे निर्णय स्वत: घेण्यास सक्षम होतात,

  कुठले करिअर करायचे ते ठरवू शकतात.
- पालकांनी करिअरचा निर्णय घेताना पाल्याची आवड व कल लक्षात घ्यावा.
- मुलांची क्षमता ओळखावी.
- मुले कोणत्या कौशल्यात निपुण आहेत हे ओळखावे.
- मुलांच्या बुद्धिमत्तासुद्धा लक्षात घ्यावा.
- पालकांनी मुलाची शारीरिक क्षमता व मुलाची तयारी लक्षात घ्यावी.
- पालकांनी मुलांशी मित्रत्वाचे नाते ठेवावे.
- पालकांनी मोठेपणाचा आव आणणे सोडले पाहिजे.
- करिअर म्हणजे पैसे मिळवणे ही पालकांची श्रद्धा मोडकळीला काढावी.
- पास-नापासचा संबंध पालकांनी करिअरशी जोडू नये.
- यश म्हणजे केवळ उत्तम करिअर घडविणे, ही बाब पालकांनी मनातून काढून टाकावी.

वरील सर्व गोष्टी पालकांनी कटाक्षाने पाळाव्यात. पालक मुलांच्या चांगल्यासाठीच सगळे करत असतात, यात संदेह नाहीच. परंतु, चांगले काय व कोणते हे पालकांनी जाणून घ्यायला हवे. अनेक संधीसुद्धा उपलब्ध आहेत हे पालकांनी विसरू नये. संधीची फळे प्रत्येक मुलाला चाखता आली पाहिजे. फक्त फळापर्यंत पोहचायची व ते फळ चाखण्याची इच्छा असली पाहिजे.

वाट जाईल तिथे जाऊ नका

जिथे वाटच जात नाही, तिथे जा

आणि आपल्या पाऊलखुणा सोडा...

काही तरी वेगळं करणारी माणसंच जगाला आगळंवेगळं देवून जातात.

(संदर्भ : तुम्ही आम्ही पालक)

बालशिक्षण

वैशाली गेडाम

# रचना

मानसीने (इयत्ता सहावी) आपले विज्ञानाचे पाठ्यपुस्तक वाचता-वाचता मला विचारले, ‘‘ रचना म्हणजे काय, हे मले नाई समजलं.’’

मी लगेच वर्गाला उद्देशून म्हणाले, ‘‘रचना म्हणजे काय, हे कोणाकोणाला समजून घ्यायचं आहे?’’

हे जरा नवीन वाटल्यामुळे काही मुले आपल्या हातातील कामे (अभ्यास, खेळ वगैरे) ठेवून माझ्याजवळ आली. मी वर्गातील काही गोल आकाराचे डबे घेतले व म्हणाले, ‘‘थांबा, आता मी तुम्हाला रचना करून दाखवते.’’

माझी ही डबे घेण्याची कृती बघून उरलेल्या मुलांना उत्कंठा वाटली. तेदेखील आपलं काम टाकून आमच्याजवळ आले.

मी हे डबे एका विशिष्ट रचनेत ठेवले, व म्हणाले, ‘‘मी डब्यांची ही एक रचना केली.’’

मग मी पटापट रचना बदलवत गेले आणि... ही एक रचना, ही दुसरी रचना, ही तिसरी रचना, ही चौथी रचना.... मग पुढे मुलेच नानाविध रचना बनवू लागली. असे करत दहा-बारा प्रकारे या डब्यांच्या रचना मी आणि मुलांनी केल्या. त्यानंतर मी आणखी काही उदाहरणे दिली. वर्गाची रचना, वर्गातील साहित्याची रचना, या बाजूला दिसणाऱ्या शेताची रचना, आपल्या शरीराची रचना, आपल्या डोळ्यांची रचना.....

मग मुलेच पुढे सांगू लागली... आपल्या गावाची रचना, झाडांची रचना, जंगलाची रचना, शाळेची रचना, घरातल्या भांड्यांची रचना, देशाची रचना .....

मुलांच्या डोक्यात खूप साऱ्या गोष्टींच्या रचना घोळू लागल्या व मुलांची यादी वाढतच गेली. अशातच साहिल म्हणाला, ‘‘मंग तं बिना- रचनेचं काहीच नाही आहे. सर्व ठिकाणी रचना आहे. रचनेशिवाय काहीच नाही.’’

मी म्हटले, ‘‘होय, रचनेशिवाय काहीच बनू शकत नाही. प्रत्येक गोष्ट ही रचना असते. हा

वर्ग, ही शाळा, हा बेंच, ही खुर्ची, हा डोंगर, हा रस्ता, ही माणसे, ही अवजारे, हे ढग... हे सारं काही रचनेनेच बनलेले आहे. आपल्या डोक्यात पण सतत विचारांची रचनाच होत असते.''

मुलांनी क्षणभर विचार केला आणि एक सत्य उकलल्याचा आनंद त्यांना झाला. मुले फारच खूश झाली. मग मुले खूप प्रकारच्या रचना सांगू लागली. मी मुलांना विचारले, ''एखादी वस्तू प्रत्यक्ष तयार होण्याअगोदर ती सर्वांत प्रथम कोठे तयार होत असेल?''

मुलांनी पटकन उत्तर दिले, ''डोक्यात!''

मला फार आनंद झाला. मी म्हणाले, ''त्या दिवशी मसावि काढण्याचे शिकण्यासाठी तुम्ही दोन वेगवेगळ्या लांबीच्या रिबिनी घेऊन त्यांचे समान लांबीचे मोठ्यात मोठे तुकडे करण्यासाठी तुमचे डोके लढविले आणि समान लांबीचे मोठ्यात मोठे तुकडे करणे तुम्हाला बरोबर जमले. म्हणजे तुम्ही जे शिकलात एक-एक अनुभव घेऊन, या शिकण्यास रचना म्हणता येईल का?''

मुले म्हणाली, ''हा.'

मी विचारले, ''ती कशाची रचना होती''

मुले म्हणाली, ''मसाविची.''

मी विचारले, ''ही रचना पहिले कुठे झाली?''

मुले म्हणाली, ''डोक्यात.''

मी विचारले, ''डोक्यात म्हणजे नक्की कोठे?''

मुले म्हणाली, ''मेंदूत.''

मी विचारले, ''मेंदूत काय निर्माण झाले?''

मुले म्हणाली, ''बुद्धी.''

मी म्हणाले, ''बुद्धी तर माणसाला पहिल्यापासून- म्हणजे जन्मल्यापासूनच असते.''

मग विचारलं, ''मसावि काढण्याचे शिकलात. ते काय होतं?''

स्नेहा म्हणाली, ''आम्हाला ज्ञान मिळलं.''

मी विचारले, ''हे ज्ञान एकदमच तयार झालं का, की त्यासाठी काही रचना डोक्यात करावी लागली?''

मुले म्हणाली, ''रचना तयार करावी लागली. ''

मी विचारले, ''मग या रचनेला काय नाव देऊ या?''

मुले म्हणाली, ''ज्ञानाची रचना!''

मी 'व्हेरी गुड' म्हटले. मुलांना सांगितले, ''आता तुम्ही मला वेगवेगळ्या रचना तयार करून दाखवा. कशाचाही रचना तयार करा.'' काही मुले वेगवेगळ्या वस्तूंच्या रचना तयार करण्यात मग्न झाली, तर काही मुले आपल्या वहीत विविध रचना लिहू लागली, काही मुले फळ्यावर विविध रचना लिहू लागली, तर काही जण माझे सांगून संपले म्हणून आपल्या कामात पुन्हा व्यग्र झाली.

विशालने रचना तयार करण्यासाठी म्हणून वर्गातील रंगीत गोट्या घेतल्या. त्या ओतताना जो आवाज झाला त्यावरून तो उत्साहाने ओरडला, ‘‘टीचर, वेगवेगळ्या आवाजाची रचना !’’

मी ‘वॉव’ म्हणाले आणि लगेच हा धागा पकडून मी प्रश्न विचारला, ‘‘आवाजाच्या रचनेवरून माणसांनी काय बनवलेय?’’

पटकन उत्तर आले, ‘‘गाणे बनवले.’’

मी विचारले, ‘‘हे पुस्तकात जे गाणं लिहून आहे ती मग आवाजाची रचना आहे का?’’

मुले म्हणाली, ‘‘नाही.’’

‘‘मग ही कशाची रचना आहे?’’

मुले म्हणाली, ‘‘ही शब्दांची रचना आहे.’’

‘‘मग आवाजाच्या रचनेवरून माणसाने काय बनवलेय?’’

विशालचे डोळे चमकले. तो म्हणाला, ‘‘मुझिक बनवले.’’

मुलांसमोर एक सुंदर विषय शिकण्यासाठी आला, म्हणून मला खूप आनंद होत होता. अशातच आस्था, तिने बनविलेली लिस्ट घेऊन आली. तिने रचना कशाकशाची असते, ते लिहून आणले होते.

तिने लिहून आणलेल्या रचना अशा-

रांगोळीची रचना
निसर्गाची रचना
माणसाची रचना
वनस्पतीची रचना
पाण्याची रचना
वस्तूची रचना
ज्ञानाची रचना
देशाची रचना
भविष्याची रचना
शेताची रचना
जगण्याची रचना
वस्तू बनविण्याची रचना
पृथ्वीची रचना
प्राण्यांची रचना
निसर्ग स्वच्छ ठेवण्याची रचना



तिने लिहिलेले 'भविष्याची रचना, देशाची रचना', 'जगण्याची रचना' वाचून तर मला तिचं फारच कौतुक वाटले. नंतर सहावीच्या काही मुली 'गवतफुला' ही कविता समजावून द्या, म्हणून माझ्याकडे आल्या. मी त्यांना कविता समजावून देऊ लागले. बाकी मुले त्यांना वाटेल तो अभ्यास करत होती आणि समीक्षा, राजलक्ष्मी व प्रिया काही तरी बनविण्यात व्यग्र होत्या. गवतफुला कवितेवरून मला आठवले की, प्रत्यक्ष गवतफुलाचा अभ्यास करायला जावं. मी मुलांसमोर प्रस्ताव ठेवला. सगळी मुले पटकन तयार झाली. आम्ही बाहेर निघालो........

आम्ही नेहमीच असे बाहेर फिरायला जात असतो आणि असे फिरायला जाताना मी मुलांना 'रांगेने चला' असे कधीच म्हणत नाही. मुले आपापल्या परीने कुणी चालत; तर कुणी धावत-पळत सुटत असतात. त्यांना रांगेने चला म्हणणे म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आल्यासारखे वाटते. शिवाय रांगेने मुलांना घेऊन जाण्यासाठी, रांग बनविणाऱ्याचं रांगेवर नियंत्रण असावे लागते, त्याशिवाय दुसऱ्याने बनविलेली रांग शिस्तीत चालू शकत नाही. मला मात्र मुलांवर नियंत्रण ठेवणे जमत नाही. आज जेव्हा आम्ही गवतफुले बघायला म्हणून शालेय आवाराच्या बाहेर आलो, तेव्हा मला एक कल्पना सुचली. ती मी मुलांसमोर मांडून पाहिली. मी म्हणाले, ''आपण आता फिरायला जाताना आपली रचना बनवून जायचं का?''

मुलांना फारच आवडली ही कल्पना. मुले उत्साहाने 'हो' म्हणाली.

लगेच मुलांनी दोन-दोन प्रमाणे आपापली रचना केली. त्यांच्या रचनेत मीही सामील झाले. आम्ही रचना बनवून चालू लागलो. मधून-मधून आपली रचना नीट आहे का, इकडेदेखील ती लक्ष देऊ लागली. रचना बनवून चालू लागलो असलो, तरी त्यात मुलांनी स्वातंत्र्य ठेवले होते. कुणाला जरा बाजूने चालण्याची, आपल्या दोन-चार मित्रांसोबत चालण्याची, जरा धावत पुढे जाण्याची इच्छा झाली तरी त्यातदेखील स्वातंत्र्य होतेच. पण रचनेतून बाहेर गेलेली ही मुलेदेखील एक रचना कायम राहील याची काळजी घेतच होती. आम्ही यापूर्वी जसे फिरायला जाताना काही मुले-मुली पुढेच निघून जायचे, असे मात्र आज झाले नाही. मुले छानपैकी रचना करून गेली आणि छानपैकी परत आली. या फिरण्यात आम्ही रस्त्यावर थांबून आस्थाच्या आईशी बोललो, साहिलच्या मोठ्या बाबांच्या घरी गेलो. त्या वेळी मुले इकडे-तिकडे विखुरली आणि शाळेच्या परतीच्या रस्त्याने ती आपापल्या परीने परत गेली.

दुसऱ्या दिवशी आस्थाने 'रचना' या विषयावर एक अत्यंत सुंदर स्फुट लिहून आणलं. ते वाचून मला फारच हर्ष झाला. तिने लिहिलं होतं:

पाहा, जसे आपल्या डोक्यामधी रचना येतात तसे झाडांना, प्राण्यांना, पक्ष्यांना सगळ्यांना रचना येते. बिना- रचनेने काहीच होत नाही. आत्ता पाहा, फुलपाखराची रचना. फुलपाखराला भूक लागते. मग भूक लागल्यावर कोणी राहू नाही शकत. मग फुलपाखरू फूल पाहते. त्याचं थोडंसं सहद (मध) प्याहावं म्हणून, आली का नाही त्यालाही रचना? बिलकुल! रचना सगळ्यांनाच येते. त्याच्यासाठी आपल्या डोक्याचा वापर करावा. खराब (वाईट) कामे नाही करावी. आत्ता पहा, फुलपाखरू गलत काम करते का? त्याला भूक लागली. फुलपाखरू गेलं आणि आपलं सहद प्यायलं. झाली का त्याची गलती? नाही झाली. सगळं करायच्या वेळी फुलपाखरू पहिले डोक्यामधी रचना बनविते

आणि मग बाहेर जाते. अशी करतात रचना.



आस्थाने लिहिलेले 'रचना' विषयावरील तिचे मंथन वाचून मला अक्षरशः आश्चर्य वाटले. किती सोपेपणाने तिने 'रचनावाद' समजावला, तोही इतक्या छोट्या वयात! जे मला या वयात कळलेय, ते इतक्या छोट्या वयात या लहानगीला कसे काय कळले असेल? आणि मला कळूनही इतक्या सोप्या शब्दांत, इतके सोपे आणि उत्तम उदाहरण देऊन मी जे मांडू शकले नाही, ते इतक्या सहजतेने तिने कसे काय मांडले असेल? होऊ शकते की, वर्गातील मुलांना जे स्वातंत्र्य मिळतंय, वर्गाबाहेर भटकायला मिळतंय, मी जे विविध विषय मुलांसमोर मांडते आणि एकदम खोलात शिरून जे शिकविण्याचा प्रयत्न करते; त्यामुळे असेल कदाचित. खरे तर मुलांकडून आलेलेच विषय मी मांडते. जसे- आज मानसीने केवळ 'रचना म्हणजे काय?' एवढेच विचारले आणि मी तो विषय एवढा पुढे नेऊन ठेवला. प्रत्येक विषय मी असाच जीवनाशी जोडून घेते. मुलांकडून आलेली प्रत्येक गोष्ट मी जीवनाशी, विज्ञानाशी जोडून शिकविते. कदाचित त्यामुळेच असेल की, मुले एवढा मोठा विचार करू शकतात. वर्गातील मुलांना ही संधी मिळतेय म्हणून त्यांची प्रतिभा, विषय समजून घेण्याची आकलनशक्ती मला दिसतेय.

यानंतर मुलांनी ज्या-ज्या गोष्टींच्या रचनांची यादी केली होती, त्यातील एक-एक विषय घेऊन त्याबद्दल सविस्तर पुढील काही दिवस मुले विचार करू लागली. उदा.- 'गावाची रचना' हा विषय घेऊन मुलांनी 'मानस प्रतिमा' काढली. गावात काय काय असते, ते त्यात लिहिले. गाव म्हणजे काय, गावातील वैयक्तिक-सामाजिक बाबी, गावाची वैशिष्ट्ये याबद्दल मुलांनी विचार केला. अशा प्रकारे देशाची रचना, पर्यावरणाची रचना यावरही मुलांनी खोलात शिरून विचार केला. मुलांना हे कळले की, कोणतीही गोष्ट रचनेशिवाय तयार होत नाही. मुले बऱ्याच ठिकाणी 'रचना' हा शब्द, ही संकल्पना वापरू लागले. त्यानंतर वीस दिवसांनी मी फळ्यावर लिहिले-

विषय : रचना- भाषेची रचना

त्याखाली फळ्यावर मानस प्रतिमा काढून त्या वर्तुळात लिहिले- भाषेची रचना.

बस, मी एवढे लिहिताच मुलांकडून पटापट संबंधित शब्द येऊ लागले. मुलांनी सांगितले-

बोलणे, वाचणे, लिहिणे, तोंड, कविता, गोष्ट, पत्र, मन, विचार, आवाज, शब्द, भावना, ऐकणे... असे लिहिणे सुरूच होते नि मानसी म्हणाली, ''टीचर, बोलणे म्हणजे काय? आपण कसे बोलतो?''

आमचा मानस प्रतिमा पूर्ण झाल्यावर मी फळ्यावर 'बोलणे' हा विषय लिहिला व मुले आता विचार करू लागली 'बोलण्याचा'. आम्ही चर्चा करू लागलो. मी मुलांना विचारले,

“आपण का बोलतो? ”

“आपल्याला आपल्या मनातलं काही तरी दुसऱ्याला सांगाचं असतं, म्हणून आपण बोलतो.”

मी पुढे प्रश्न केला, “आपण बोलतो तेव्हा नक्की काय होते?”

मुले म्हणाली, “आपल्या तोंडातून आवाज येतो.”

“आवाज नेमका कोठून येतो?”

“कंठातून.”

मुलांनी गळ्याकडे हात नेला व ते आपला कंठ चाचपून नेमका कोठून आवाज येतो ती जागा मला दाखवू लागले. नंतर मी प्रश्न केला, “बोलण्यासाठी कोणकोणत्या अवयवांची गरज असते?”

मुलांनी सांगितलं, “जीभ, दात, आभाळ (तालु), कंठ, ओठ, मूर्धा.”

मी पुढे प्रश्न केला, “कोणत्या अवयवातून कोणती अक्षरे येतात?”

असे विचारताच मुले अक्षरे काढून पाहू लागली व आमची खालील यादी तयार झाली. मुले सांगू लागली तसतशी मी लिहू लागले.

जीभ- सर्व अक्षरांसाठी

दात- स, त, ध, न, थ, द, ल, व

तालु- ल, ज, ळ, क्ष, य, च, छ, झ

ओठ- भ, म, प, फ, ब, अं

मूर्धा- य, ट, ठ, ड, ध, ण, र

कंठ- अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ, अः

सध्या आम्ही इथपर्यंत येऊन पोचलोय आणि मला हे आपल्यासमोर मांडावे वाटले, म्हणून हा लेख लिहिलाय. हे शिकणे असेच पुढे-पुढे जात राहील. मात्र त्यादिवसापासून मी बरेच विषय ‘रचना’ हा मुख्य विषय घेऊन मुलांसमोर मांडतेय. म्हणजे फळ्यावर आधी विषय - रचना असा लिहिते व त्यासमोर शिकण्याचा विषय लिहिते. यात भाषा, गणित, विज्ञान, भूगोल हे सर्व विषय ‘रचना’ हाच पाया घेऊन आता मी शिकविते. मुले प्रत्येक गोष्टीकडे रचना या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करीत आहेत. आणि रचना आहे म्हणून प्रत्येक गोष्टीकडे एका संवेदनेतून बघू लागलीयत मुलं. आता वर्गात आणखी एक नितांत सुंदर विषय आलाय, जो आम्ही रचना या विषयाच्या संगतीने शिकतोय. अगदी हा विषय जसा उपस्थित झाला, त्याच पद्धतीने तोही विषय माझ्यापुढे मुलांनीच आणला; तो पुढील लेखात!

(क्रमशः)

परीशिलन

प्रभाकर खाडिलकर

# हा खेळ संकल्पनांचा

आपला पाल्य पहिली ते पाचवी या इयत्तेत असेल तर त्यांच्यासाठी ही माहिती वाचा, जी खास करून आपणासाठी आहे. यातून आपणाला बदलत्या शिक्षणाची दिशा कळावी, आपल्या पाल्याचा अभ्यास घेता यावा, यातून त्याची प्रगती कळावी- अशी अपेक्षा आहे.

निरक्षरतेकडून साक्षरतेकडे, साक्षरतेकडून सुशिक्षिततेकडे- असे करत-करत आज आपण शिक्षणाबद्दलच्या जागरूकतेपर्यंत पोहोचलो आहोत. अशा वेळी या शिक्षणाचा पाया प्राथमिक शाळेत पक्का करून घेणे, ही शिक्षकांबरोबर पालकांची पण जबाबदारी बनली आहे. त्यामुळे मुला-मुलींना ते पहिल्या इयत्तेत आल्यापासून काय व कसे शिकवले पाहिजे, याचा विचार या लेखात मांडला आहे.

शाळेतील क्रमिक पुस्तकातून मुले जे काही शिकत असतात, तेवढे आज पुरेसे नाही. कारण २००९ ला महाराष्ट्राने नवा शैक्षणिक कायदा स्वीकारल्यानंतर मूल्यांकन वा परीक्षापद्धतीच बदलली आहे. पहिली ते पाचवीपर्यंतच्या इयत्तांना निम्न-प्राथमिक असा स्तर वा दर्जा देताना त्याच्या अध्ययन-पद्धतीतील लेखी परीक्षांचे महत्त्व कमी केले आहे. प्रत्येक विषयातील १०० गुणांपैकी ३० किंवा ४०% भारमूल्य (Weightage) धड्यांवरील लेखी परीक्षांना दिले असून त्या गुणांना संकलित मूल्यांकन (Summative Evoluation) म्हटले आहे. उरलेले ६० ते ७०% भारमूल्य हे आकारिक मूल्यांकनाला (Formative Evoluation) देण्यात आले आहे. त्यामुळे या सध्याच्या मूल्यांकन पद्धतीतून आपला पाल्य कितपत हुशार आहे, हे कळत नाही. असे का ते, ती मूल्यांकनपद्धत समजून घेतल्यावर आपणाला कळेल.

**आकारिक मूल्यांकन :** आकारिक याचा अर्थ मुलांच्या विकासाला आकार देणारे अध्ययनातले विविध घटक- जे पाठ्यपुस्तकाशी निगडित असलेच पाहिजेत, असे नाही. ते घटक विद्यार्थी किती आत्मसात करतात, हे शोधून वेळोवेळी त्याच्या नोंदी ठेवून त्याप्रमाणे त्याला गुणदान करणे म्हणजे आकारिक मूल्यांकन. संकलित म्हणजे लेखी परीक्षेच्या गुणांचे मूल्यांकन. सध्याच्या

परीक्षापद्धतीत त्याबरोबर या आकारिक मूल्यांकनाचे गुण हे परीक्षेचा भाग समजून एकत्र करून १०० पैकी गुण दिले जातात. आकारिक मूल्यांकनाचे शासनाने काही घटक निश्चित केले असून त्यामध्ये दैनिक निरीक्षण, तोंडी काम, प्रात्यक्षिक, कृती/उपक्रम, प्रकल्प, पुस्तक पाहून चाचणी, स्वाध्याय/ वर्गकार्य इतर असे ८ घटक आहेत. त्यापैकी शाळेच्या सोईने ५ घटकांचा समावेश करून त्यावर आधारित ६० ते ७०% गुण देण्याचे स्वातंत्र्य शिक्षकांना दिले आहे. या संकलित आणि आकारिक मूल्यांकनावरून एकूण गुण कसे दिले जातात, यासाठी एक उदाहरण घेऊ. उदा.दुसरीतील एखाद्या विद्यार्थ्याला गणिताच्या लेखी परीक्षेत सहामाही आणि वार्षिक मिळून १०० पैकी ६० गुण मिळाले असतील, तर त्याचे संकलित गुण केवळ ३० पैकी १८ होतात. त्या विद्यार्थ्याच्या आकारिक मूल्यांकनातील गुणाची संख्या गणितासाठी वर्षाला ७० पैकी ५० असेल, तर त्याची गणिताच्या गुणांची बेरीज १०० पैकी ६८ होईल. हेच पूर्वी लेखी परीक्षेला ८० पैकी गुण दिले जात असल्यामुळे आकारिक मूल्यांकनाचा एकूण गुणांवर फार परिणाम होत नसे, तो आता होतो. वरील आकारिक मूल्यांकनपद्धतीत लेखी परीक्षेसारखे गुणदानाचे निश्चित निकष नसल्याने त्या गुणदानात चूक होऊ शकते. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याला त्या-त्या विषयात मिळालेल्या एकूण गुणांवरून आपल्या पाल्याने प्राप्त केलेल्या ज्ञानाचा स्तर कोणता, हे समजणे पालकांनाही कठीण बनत चालले आहे. शिवाय या परीक्षापद्धतीत नापास करण्यालाही परवानगी नाही. त्यामुळे प्राप्त ज्ञानाचा स्तर कळण्यासाठी काय करावे, याचा विचार करताना मला वाटले की- परीक्षेतील गुण कळण्यापेक्षा त्या ज्ञानघटकांची मूळ संकल्पना कळणे गरजेचे आहे. हे ज्ञानघटक समजून घेण्याअगोदर प्रथम ज्ञानग्रहणाचीच संकल्पना समजून घ्यायला हवी.

**ज्ञानग्रहण म्हणजे नक्की काय? :** 'माणूस म्हणून माझी ओळख' यासाठीच्या संकल्पनेतील माझ्या गाण्यात 'तोंडाने मी खातो खाऊ' आणि 'नाकाने घेत श्वास मी' अशा ओळी आहेत. येथे खाऊ म्हणजे अन्न व पाणी आणि श्वास म्हणजे हवा या गोष्टी आपण शरीराच्या आत घेत असतो. यातील अन्न व पाणी पोटात जाते आणि श्वास फुप्फुसात जातो. म्हणजे या तीनही गोष्टी जशाच्या तशा शरीरात जातात. पण आपण जी बाह्य गोष्टींची माहिती घेतो, ती आपल्या ज्ञानेंद्रियांमार्फत आपल्या मेंदूत जाते, असे आपण म्हणतो. म्हणजे नक्की काय होते, हे सहजपणे कळत नाही. तेव्हा उत्तर सांगायचे, तर त्याला उदाहरण द्यावे लागेल. मी झाड पाहतो, मी गाणे ऐकतो. पण ते झाड वा गाणे जसेच्या तसे अन्न-पाण्यासारखे माझ्या मेंदूत जात नाही, तर आपल्या मेंदूच्या कॅमेऱ्यात झाडाचे चित्र टिपले जाते. गाण्याचे सूर-शब्द-आवाज याचे मेंदूत रेकॉर्डिंग होते आणि त्यालाच आपण झाड व गाण्याचे ज्ञान झाले, असे म्हणतो. अशा अनेक गोष्टी आपण अनुभवून त्यांचा मेंदूत साठा करून ठेवतो आणि लागेल तेव्हा आठवून त्याचा उपयोग करतो. मी काय पाहिले, काय ऐकले, हे त्यानंतर आपण दुसऱ्याला पण सांगू शकतो. यावर आधारितच आपली लेखी वा तोंडी परीक्षा होते. असो. ज्ञानग्रहणाच्या या कल्पनेपाशी न थांबता आपण मुले प्रत्यक्ष शिकतात कसे, ते पाहू.

**मुले शिकतात कशी? :** मुले प्रथम शिकतात ते मोठ्यांचे पाहून, त्यांच्या अनुकरणातून, त्याप्रमाणे कृती करून, त्यांचे ऐकून, संवादातून म्हणजे ऐकणे-बोलणे यातून. त्यामुळे शिक्षण घेताना ऐकणे-बोलणे या दोन क्षमता आवश्यक आहेत. त्यांच्या आधारे मुलांमध्ये वाचणे आणि

लिहिणे ही कौशल्ये येणे सोपे जाते. या चारही गोष्टी हा भाषाशिक्षणाचा भाग असतो आणि त्यातूनच ज्ञानग्रहणाची वा शिक्षणाची सुरुवात होते. या प्रक्रियेत जी भाषा वापरली जाते, तिला शिक्षणाचे माध्यम म्हणतात; मग ती भाषा मराठी, हिंदी, इंग्रजी कोणती का असेना, ते चालते. ती माध्यम म्हणून स्वीकारताना प्राथमिक शिक्षणात ती मातृभाषा असावी, असे युनोने शिक्षणाबद्दलच्या दस्तऐवजात स्पष्ट केले आहे. याचा अर्थ- मुलांना पुढे काहीही शिकायचे असेल, तर त्यांना माध्यमाची प्रथम भाषा शिकावी लागते.

आता आधुनिक सिद्धांताप्रमाणे मुले शिकतात ते केवळ ऐकून नव्हे; तर एखादी गोष्ट, चित्र वा चित्रफीत (video) डोळ्यांनी पाहून, त्या विषयासंबधातील कृती करून. ही शिक्षणप्रक्रिया अधिक प्रभावी होण्यासाठी त्या कृती किंवा ते पाहणे, ऐकणे आनंददायी असायला हवे. मुलांना शिकवायचे नसते, तर त्यांनी आपणहून शिकायचे असते. त्यासाठी त्या विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देणे, कृतीसाठी साधने पुरविणे ही शिक्षकाची जबाबदारी आहे. 'मी दिले त्याने घेतले... मी सांगितले, त्यांनी ऐकले- असा हा पैशाच्या देव-घेवीसारखा किंवा आज्ञाधारक नोकरासारखा प्रकार आता राहिला नाही. त्याऐवजी ज्ञानरचनावाद ही नवी पद्धत शिक्षणात आलेली आहे, जी आपण आता थोडक्यात समजून घेणार आहोत, त्यामध्ये पाठांतरापेक्षा आकलनाला महत्त्व आहे. त्यासाठी अनुभवांची उपलब्धता आणि कृतींचा वापर आवश्यक आहे.

**ज्ञानरचनावाद :** आपल्याभोवताली अनेक गोष्टी दिसत असतात, घटना घडत असतात. त्यातील आवश्यक वाटणाऱ्या गोष्टीचे ज्ञान आपण मुलांना अभ्यासाविषयाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करत असतो. त्याची जी आधुनिक पध्दत आहे, ती ज्ञानरचनावादावर आधारलेली आहे. त्यामध्ये जी नवी माहिती अनुभवाच्या स्वरूपात आपल्यासमोर येते, ती पूर्वीच्या अनुभवाशी किंवा पूर्वज्ञानाशी प्रथम ताडून बघावी लागते. त्यावर विचार करावा लागतो. त्यातून ती नवी माहिती बरोबर वाटली, तर त्या गोष्टीचे ज्ञान झाले असे आपण म्हणतो; पण ते ज्ञान योग्य आहे याची खात्री होण्यासाठी त्याबाबत इतरांशी बोलणे, चर्चा करणे आवश्यक असते. अशा तऱ्हेने जे ज्ञान आपणाला पटते खरे व उपयुक्त वाटते, त्याची रचना आपल्या मेंदूत करून ते माझे आकलन, माझे ज्ञान म्हणून पक्के करून स्मरणात ठेवतो. अशा ज्ञान मिळविण्याच्या पद्धतीला ज्ञानरचनावाद किंवा रचनावाद असे म्हणतात. या पद्धतीत ज्ञान मिळवताना ऐकणे, पाहणे, कृती करणे, प्रत्यक्ष अनुभव घेणे अपेक्षित






आहे. असे ज्ञान केवळ पाठ्यपुस्तकातले धडे वाचून मिळत नाही, तर त्याबरोबर त्या ज्ञानामागच्या मूळ संकल्पना समजून घ्याव्या लागतात. या पद्धतीमुळे मिळालेले ज्ञान पाठांतरित ज्ञानापेक्षा अधिक उपयुक्त व दीर्घ काळ टिकणारे असते. अशा ज्ञानाचा उपयोग करताना ते अधिक सोपे जाते. म्हणून त्या व्यक्तीची बौद्धिक पातळी पाठांतरित ज्ञानापेक्षा अधिक चांगली असते. त्यातून त्या व्यक्तीला केवळ कोणाचे ऐकून नव्हे, तर विचार करून ज्ञान स्वीकारायची सवय लागते.

**अभ्यास संकल्पनांचा :** ज्ञान ग्रहण करताना एखाद्या वस्तूची माहिती आपण करून घेतो. ती वस्तू दिसते कशी, तिचा आकार-रंग-रूप काय, तिचा उपयोग काय- असा विचार करत त्या वस्तूचे आपण जमेल तेवढे ज्ञान मिळवत जातो. त्या वेळी ज्ञानाचे माध्यम म्हणून आपणाला मातृभाषेचा अगर इंग्रजीसारख्या वेगळ्या भाषेचा आधार घ्यावा लागतो. त्यासाठी त्या भाषेतील ज्या शब्दाचा वापर आपण करतो; त्याचा नक्की अर्थ, त्याचा वापर कुठे आणि कसा करायचा- हे कळणे गरजेचे असते. कारण त्या शब्दातूनच बराच आशय ज्ञानस्वरूपात व्यक्त होत असतो. म्हणून त्या शब्दाला किंवा त्या शब्दामागच्या कल्पनेला संकल्पना म्हणता येते. तो शब्द वाचल्यानंतर त्यातून जे ज्ञान जाणवते, त्याला आपण संबोध म्हणू शकतो. उदा.- बेरीज हा शब्द, जो गणिताशी संबंधित आहे. जेव्हा एकापेक्षा जादा संख्या एकमेकांत मिसळून त्यांची जी एकत्रित संख्या बनते, तेव्हा त्या क्रियेला बेरीज असे नाव आहे. म्हणजे मिसळण्याच्या क्रियेला बेरीज म्हणतात आणि काढून घेण्याची जी क्रिया आहे, तिला वजाबाकी म्हणतात. यातून अधिक-उणे किंवा पॉझिटिव्ह-निगेटिव्ह यांचा संबोध होतो. बेरीज असो अगर वजाबाकी- यामध्ये ५ + ३ किंवा ८ - २ असे केवळ अंक नसतात; तर त्याच्याबरोबर ५ व ३ आंबे, ८ व २ पेरू अशा वस्तू पण असू शकतात. कारण गणितातील बेरीज-वजाबाकीसारख्या साऱ्या क्रिया व्यवहाराशी निगडित आहेत. तेथे वस्तू कोणतीही असली तरी चालते, कारण त्याच्यावर ती गणिताची आकडेमोड अवलंबून नसते. गणिताप्रमाणे भाषा, इतिहास, भूगोल, विज्ञान अशा प्रत्येक विषयाशी निगडित अनेक शब्द आहेत, ज्यातून तो विषय शिकवला जातो. म्हणून तो विषय पक्का होण्यासाठी त्या विषयातल्या त्या शब्दाशी निगडित संकल्पना समजून घेणे गरजेचे आहे.

मूल्यांकन करण्याची संकलित व आकारिक अशी जी पद्धत आहे, त्यांची माहिती घेतल्यानंतर आपणाला लक्षात येते की- ज्ञानाची पातळी केवळ विद्यार्थ्याला त्या विषयातल्या परीक्षेच्या गुणांवरून किंवा श्रेणीवरून नव्हे; तर त्यातल्या मूलभूत संकल्पना त्याला किती समजल्या आहेत, त्यातल्या त्याने किती आत्मसात केल्या आहेत यावरून कळते. यासाठी त्या विद्यार्थ्याने त्या संकल्पनांचा तार्किक पद्धतीने विचार करून त्यांचा आशय समजून घेणे गरजेचे आहे. असे घडले, तर त्याने घेतलेले ज्ञान अधिक पक्के होते. यातून त्याची आकलनशक्ती आणि विचारशक्ती वाढते. यालाच काही जण 'त्याच्या जाणिवा वाढतात' असे म्हणतात. यातून त्यापुढच्या कठीण संकल्पना सहजपणे समजायला लागतात. हे तो सारे स्वत: करत जातो, म्हणजेच यातून ज्ञानरचनावादी अध्ययनप्रक्रियेला गती मिळते. जर मूळ ज्ञानाच्या संकल्पना पक्या झाल्या, तर पाठ्यपुस्तकावरची लेखी वा तोंडी परीक्षा असो की त्याचे आकारिक मूल्यांकन असो- या सगळ्यामध्ये तो सहजपणे यश मिळवू शकतो. यासाठी मुलांना कळेल अशा सोप्या पद्धतीने संकल्पनांची माहिती देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. म्हणून या लेखाला मी 'हा खेळ संकल्पनांचा' असे नाव दिले आहे.

या संकल्पनांचा क्रम लावणे, त्यात काय असावे हे ठरविणे अवघड आहे. त्यासाठी त्या संकल्पनेवर आधारित कवितेच्या छोट्या ओळी, चित्रे, कृती वा खेळ यांचा काही ठिकाणी वापर केला आहे. उदा.- सांगायचे झाले तर वर-खाली ही संकल्पना वा घटक शिकविताना त्यात माणूस, झाड व इमारत आदींची चित्रे देऊन त्यांचे अवयव, भाग, मजले कसे आहेत याचा विचार करायला सांगितले आहे. त्यावरचा खेळ म्हणून साप-शिडी, मनोरा लावणे, टेकडी चढणे असे खेळ येतात. मुले जसजशी त्या संकल्पना पक्क्या करत जातील तसतसा त्यांचा उपयोग आपल्या धड्यातून कोठे केला आहे, हे त्यांना शोधायला सांगता येते. गणिताचा संबोध वा गणितातील अंक व बेरीज-वजाबाकी अशा गोष्टी शिकवताना लहान-मोठा, कमी - जादा, दुप्पट-निम्मा, पहिला-दुसरा-शेवटचा, देणे-घेणे काहीच नाही म्हणजे ०, असे करत-करत मुलांना गणित समजायला व आवडायलाही लागते. पुढे परिसराच्या निरीक्षणातून मुलांच्या मनात 'वारा का वाहतो? पाऊस का पडतो? गाय निळी व आकाश हिरवे का नाही? विजेचा शॉक का बसतो? दगड जड व लाकूड हलके का?' असे प्रश्न पडायला लागतात. याचा अर्थ तो 'विचार करायला लागला आहे, हे कळते. अशा विचारांना वळण लावून त्यांच्या शंकांना उत्तरे देत आपण निरीक्षण व कृती यातून विज्ञानाच्या संकल्पनांकडे मुलांना वळवू शकतो. पुढे वस्तुमान, वजन, बल या थोड्या अवघड संकल्पनाही मुलांना कळायला लागतात. भाषेचेही तसेच आहे. त्यातले उच्चार, उच्चारांवर आधारित अक्षरे, शब्द, वाक्य हे सगळे कळत जाणे हे या संकल्पनांच्या खेळातून सोपे जाते. यातून मुलांचे बोलणे-लिहिणे सुधारते. त्यांना धड्याबाहेरचे वृत्तपत्रासारखे वाचन करता यायला लागते. मुलांची विचारशक्ती वाढणे हा जो सध्याच्या शिक्षणाचा उद्देश आहे, तो या पद्धतीतून साधेल याचा मला विश्वास आहे. यासाठी या संकल्पनांची मांडणी करताना ती कशी करायची आणि ती पद्धत कुठल्या इयत्तेपासून वापरायची, याचा विचार आपण पुढील लेखात करू.

(क्रमश:)

## चांगल्या वर्गशिक्षणासाठी मेंदू-संशोधनांचे २१ निष्कर्ष

**गेल्या तीस वर्षांतील मेंदू-संशोधनातून काही निश्चित स्वरूपाचे निष्कर्ष हाती लागले आहेत. त्यामुळे त्यांचा समावेश करून दैनंदिन शिक्षणव्यवहारास नवे वळण देणे शक्य आहे.**

१) नवी माहिती शिकणाऱ्याच्या पूर्वज्ञानास जोडून मिळाल्यास शिकणे चांगले होते, प्रभावी होते.

२) मेंदूची सर्वसामान्य संरचना (structure) जरी समान असली, तरी प्रत्येक मेंदू भिन्न असतो. शिकण्याबाबत सर्व मेंदूंचे संघटन एकाच प्रकारे होत असले, ठरावीकच मेंदूंचे भाग विशिष्ट कामात असले; तरी प्रत्येकाची शिकण्याची शैली वेगळी असते. प्रत्येकाचा मेंदू वेगळा असतो.

३) शिकण्याची क्षमता, समस्यानिवारण इ. बाबतींत सर्व मेंदू समान नसतात, प्रत्येक मेंदूची क्षमता भिन्न असते. आजूबाजूचे वातावरण, शिकण्याची प्रेरणा, पूर्वज्ञानाचे स्वरूप या प्रत्येकाचा संदर्भ वेगळा असतो.

४) मेंदू ही एक अतिशय गुंतागुंतीची, गतिमान पण एकजिनसी अशी यंत्रणा असते. ती प्रत्येक नव्या अनुभवाने बदलते.

५) मानवी मेंदू खूप लवचिक असतो. वयोमानानुसार जरी काही मर्यादा आल्या, तरी मेंदू आयुष्यभर विकास पावतो.

६) ताणाचा शिकण्यावर परिणाम होतो. आव्हानात्मक ताण एकाग्रता साध्य करून शिकणे प्रभावी करतो, तर ओझे लादणारा ताण (धाक इ.) शिकणेच कठीण करतो.

७) मेंदूच्या विकासात काही कालावधी खूप संवेदनशील असतात. या काळात काही कौशल्ये सहजपणे नि वेगाने आत्मसात होतात.

८) निर्णयप्रक्रियेत भावनांचे महत्त्व अनिवार्य आहे.

९) दुसऱ्यांकडून (पालक, शिक्षक, सहकारी, विद्यार्थी इ.) होणारे साह्य (शैक्षणिक, भावनिक, नैतिक इ.) शिकणे पर्याप्त पातळीपर्यंत नेण्यास मदत करते.

१०) ज्या पेशींचा वापर होतो, त्यांची संपर्कस्थाने बळकट होतात; तर वापर न होणाऱ्या पेशींची संपर्कस्थाने कमजोर होत असतात. (use it or lose it वापरा अथवा विसरा.)

११) ज्ञानाचा वैयक्तिक जीवनाच्या संदर्भात संबंध बांधला गेला, तर शिकणे सोपे होते.

१२) आत्मसन्मान हा शिकण्याला प्रेरक ठरतो.

१३) मेंदू एका पद्धतीने, सरळ रेषेत (Linear) शिकत नाही. त्यामुळे एकाच वेळी अनेक संवेदनांना जागरूक करणाऱ्या पद्धती वापरणे (वाचन, श्रवण, दृश्य, गटपद्धतीतील प्रकल्प इ.) इष्ट असते.

१४) मेंदू हा क्रियाहीन (Passive) वर्गशिक्षणासाठी निर्माण झालेला नाही. स्वत: करून, विविध अनुभव घेऊन, आनंद घेत शिकत जाण्याची त्याची रीत आहे.

१५) विद्यार्थी आपल्या ज्ञानाची व कौशल्यांची बांधणी कृतीतून चांगली करू शकतात.

१६) संगीत- त्यातही सौम्य वाद्यसंगीत शिकण्याला चांगली मदत करते.

१७) शारीरिक हालचालीचे मुक्त वातावरण विषयशिक्षणाला मदत करते.

१८) विनोद हा शिकणे वृद्धिंगत करतो.

१९) संपन्न वातावरण विद्यार्थ्यांना अधिक चलाख (smart) बनवते.

२०) वेगवेगळे विद्यार्थी वेगवेगळ्या बुद्धिमत्ता घेऊन आलेले असतात, त्यामुळे त्यांनी एकाच पद्धतीने शिकण्याचा आग्रह धरणे इष्ट नसते.

२१) उच्च प्रतीच्या वैचारिक शिक्षणासाठी स्व-नियंत्रण ही एक आवश्यक बाब आहे.

**नवे शिक्षण, नव्या दिशा**

**नीलम संकपाळ**

# माझे नवे शिक्षण...

शिक्षण तसेच शिक्षणशास्त्रातील एम.ए., बी. एड. ही पदवी मिळाल्यानंतर आपण एक शिक्षक म्हणून पात्र आहोत, अशी भावना मनात असायची आणि तसेच झाले. एका माध्यमिक विद्यालयात माझी नियुक्ती झाली. आठवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी व इतर शालेय विषय शिकवण्याची संधी मिळाली. बी. एड.ला असलेला अभ्यासक्रम व पाठांच्या पायऱ्या लक्षात घेऊन अध्यापनही करीत राहिले. परंतु विद्यार्थ्यांची मानसिकता, आवड, कल, क्षमता, इतर गुण यांकडे कधीच लक्ष न देता अभ्यासक्रम शिकवणे, हेच ध्येय राहिले. पाठ्यपुस्तक व त्याला संबंधित अभ्यास तसेच चाचणी व (सत्रासाठी) सत्रपरीक्षेसाठी आवश्यक असेच घटक शिकवणे हे, ध्येय मुख्यत: होते. परंतु जेव्हा मला ग्राममंगल व पानसेसर यांचा सहवास आणि मार्गदर्शन मिळाले तेव्हा माझ्या शिक्षणाला-शिकवण्याला नवी दिशा मिळाली. शिक्षिकेचे काम हे पाठ्यपुस्तक शिकणे व शिकवणे एवढेच नसून, 'विद्यार्थ्यांना विविध अनुभव देणे म्हणजे शिक्षण होय.' मुलांच्या भावभावना लक्षात घेऊन, कल-मानसिकता जाणून त्यांना शिकतं करणं म्हणजे शिक्षण! 'शिक्षणाचा व्यवहाराशी सांगड घालता येणं म्हणजेच शिक्षण होय.' अशा प्रकारे मला शिक्षणाचा व शिकविण्याचा अर्थ समजला. समजा- एखाद्या मुलाला शालेय परीक्षांमध्ये अ - १ श्रेणी म्हणजेच ९० पेक्षा जास्त गुण आहेत. परंतु त्या मुलामध्ये नेतृत्वगुण नसेल, तो आरोग्यसंपन्न नसेल, तो चारचौघांमध्ये आपले मत व्यक्त करू शकत नसेल, दुकानात जाऊन चौकसपणे खरेदी करू शकत नसेल, सर्वांशी मिळून-मिसळून वागावे हे त्याला समजत नसेल; तर त्याच्या गुणांचा व त्याच्या शिक्षणाचा काय उपयोग?

मुलांना शिकवत असताना त्यांच्यात स्वयंशिस्त, नीटनेटकेपणा, सहकारी वृत्ती, समायोजन, परिसराचे निरीक्षण, ज्ञान मिळवण्याची जिज्ञासा निर्माण करणे गरजेचे आहे. आपण ज्या परिसरात राहतो त्या परिसराची नीट पाहणी करणे, निरीक्षण करणे गरजेचे आहे. उदा.-आपल्या शेतीत कोणकोणती पिके घेतली जातात, ती केव्हा घेतात, आपल्या परिसरातील झाडे-फुले-पिके- वनस्पती-प्रदेश यांच्याकडे पाहण्याची नवी दृष्टी निर्माण करणे, म्हणजे शिक्षण होय, असे लक्षात आले.

शाळेत जाणाऱ्या मुलांना पोस्टऑफिस, ग्रामपंचायत, बँका किंवा कोणत्याही शासकीय कार्यालयाविषयी व त्यांच्या कार्याविषयी काही घेणे-देणे नसते. परंतु, नव्या शिक्षणात मुलांना शालेय अभ्यासाबरोबर सुषमाताई यांच्या मार्गदर्शनाखाली वर्गखोलीतून बाहेर काढले आणि 'क्षेत्रभेट' हा

नावीन्यपूर्ण उपक्रम राबवला. या क्षेत्रभेट या उपक्रमातून आमच्या असे लक्षात आले की- मुलांच्या मनात खूप-खूप प्रश्न असतात. त्यांना थोडी मोकळीक दिली की, ते विविध प्रश्न विचारतात. असाच एक अनुभव-

विकासघर, कवठे जि. प. शाळा, कवठे येथील दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांना घेऊन प्राथमिक आरोग्यकेंद्र, कवठे येथे भेट दिली. तेव्हा मुलांनी डॉक्टरांना खालील प्रश्न विचारले.

* आपण जेव्हा आजारी असतो तेव्हा गोळी खातो. पण गोळीला कसे काय समजते की, माझ्या पोटात दुखत आहे?

* तुमचे शिक्षण काय?

* किती वर्षे झाली, तुम्ही हे काम करता?

* दिवसातून किती पेशंट तपासता?

* तुम्ही स्वत:ला सुई टोचता का?

* लसीकरण का करतात?

* दवाखान्यात किती खोल्या आहेत?

* काम करणारे स्टाफ मेंबर किती आहेत?

* दवाखान्यात किती डॉक्टर आहेत?

असे नानाविध प्रश्न मुलांनी विचारले? डॉक्टरांनी मुलांच्या प्रश्नांना समाधानकारकपणे उत्तरे दिली. सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाल्याने मुले आनंदी होती व दवाखान्याविषयीची त्यांची भीती कमी झाली. 'दवाखाना म्हणजे इंजेक्शन' हे सूत्र पुसट झाले.

दुसरा अनुभव : खडकी विकासघर, जि. प. शाळा, खडकी येथील विद्यार्थ्यांची स्थानिक दूध डेअरीस भेट. दूध डेअरी हा विषय घरातील मोठ्या माणसांचा. लहान मुलांचे काय काम? असा प्रश्न पालकांच्या मनात आला. डेअरी तर जवळचीच आणि रोजच्याच पाहण्यातील आहे; मुलं यातून काय शिकणार, असे पालकांना वाटत होते.

परंतु, डेअरीविषयी माहिती घेण्यासाठी आम्ही सुर्वेकाका यांच्या डेअरीला भेट दिली; तेव्हा मुलांनी डेअरीमालक सुर्वेकाकांना पुढील प्रश्न विचारले :

* तुम्ही फक्त म्हशीचेच दूध घेता का?

* दूध शिळे/ खराब आहे, कसे ओळखता?

* तुम्ही इथे किती जण काम करता?

* या दुधाचे पुढे काय होते?

* दुधाचे पैसे लगेच की नंतर देता?

*दुधात पाणी मिसळले आहे, हे तुम्हाला कसे समजते?

* प्रत्येकाचा हिशोब तुमच्या लक्षात कसा राहतो?

* जनावरांसाठी कोणती पशुखाद्ये विक्रीसाठी ठेवली आहेत?

* तुम्ही शेतकऱ्यांना दिवाळीला भेटवस्तू देता, ती तुमच्या खर्चाने की दूध-संकलनामार्फत?

असे मुलांचे विविध प्रश्न संपतच नव्हते. सुर्वेकाकांनी दूध डेअरीमधील विविध साधनांची ओळख करून दिली. त्यांनी फॅट मशीन, संगणक, इलेक्ट्रॉनिक वजन-काटा या साधनांचा प्रत्यक्षात वापर करून दाखविला. फॅट मशीनद्वारे दुधातील फॅट्स कसे ओळखता येतात, हे दाखविले. या क्षेत्रभेटीमुळे मुलांना अनेक प्रत्यक्ष अनुभव मिळाले. म्हणजेच - विविध मापे त्यांना पाहावयास मिळाली. विविध पशुखाद्ये फॅट मशीनचा वापर, संगणकावर प्रत्येक शेतकऱ्याची नोंद, दुधाचे बिल कसे मिळते- याबाबत

माहिती समजली. मुलांनी न घाबरता एवढे छान प्रश्न विचारले, म्हणून सुर्वेकाकांनी त्यांचे कौतुक केले व खाऊ दिला. मुलांना मिळालेला हा अनुभव म्हणजेच ज्ञान आहे.

मुलांना शालेय शिक्षणाबरोबर समाजात कसे वावरावे, बोलावे, चालावे याचे ज्ञान देणे, ही शिक्षकाची एक महत्त्वाची भूमिकाच आहे.

छोट्या-छोट्या मुलांशी मोठ्याने बोलले, त्यांना रागावले की, मुले नाराज होतात. अभ्यासाविषयी त्यांची गोडी कमी होते. परंतु मुलांना जर आपुलकीने, सहानुभूतीने जवळ घेतले की, बघा ती आपल्याशी कशी समरस होतात आणि आपण दिलेले अभ्यासाचे काम चुटकीसरशी पूर्ण करतात.

घरात कोणी पाहुणे आले असतील, कोण रागावले असेल, सण-समारंभ असेल... साधी पेन्सिल सापडत नाही म्हणून रडणारी व शाळेत न येणारी मुले आहेत. या अशा छोट्या-छोट्या कारणांमुळे मुलं दु:खी व निरुत्साही बनतात. अशा वेळेस शिक्षकाचे काम आहे की, त्या मुलाजवळ जाऊन त्याची प्रेमाने चौकशी करावी. रडण्यामागचे कारण जाणून घेऊन योग्य ते मार्गदर्शन करावे. समजूत घालून व त्याला अभ्यासाकडे वळवावे. छोट्या मुलांना समजावून सांगितले की, कोणतेही कारण असो- ते मुलं विसरतात व विविध उपक्रमांमध्ये सहभागी होतात.

या सर्व गोष्टींचा विचार करून जर आपण अध्यापन केले; तर आपण मुलांची आवडती ताई (बाई) बनतो, हे सर्व मला ग्राममंगलमध्ये आल्यानंतरच उमगले. बालकांकडे बघण्याचा माझा दृष्टिकोनच बदलला.

मोठ्या माणसांच्या विचाराप्रमाणेच लहान मुलांच्या विचारांना, त्यांच्या बोलण्याला महत्त्व द्यावे, हे समजते. घरातील सर्व कामांमध्ये मुलांना सहभागी करून घेणे... मुलांना आपल्यासोबत मंडई, दवाखाना, बँक, पोस्ट ऑफिस, पैसे काढण्यासाठी एटीएम ऑफिस, यात्रा, बाजार, समारंभ, उत्सव, प्रदर्शन या विविध ठिकाणी नेल्यामुळे मुले कळत-नकळत अनेक गोष्टी शिकत असतात, हे लक्षात आले.

मुलांना बाजारात नेल्यानंतर मुले एखाद्या गोष्टीचा हट्ट करतात, रडतात; म्हणून मुलांना बाजारात किंवा इतर कोणत्याही ठिकाणी घेऊन न जाणे, हाच पर्याय आई निवडते. परंतु, तसे न करता, मुलांची समजूत घालून विविध गोष्टी समजावून सांगितल्यानंतर मुले विविध गोष्टींचा हट्ट करत नाहीत. उलट बाजारात नेल्यानंतर त्यांच्याशी गप्पा मारता येतात. विविध भाज्या दाखविता येतात. विविध वस्तूंचा व्यवहार त्यांच्या लक्षात येतो. पैशाची देवाण-घेवाण, खरेदी-विक्री हे व्यवहार मुलांना समजतात. अशा एक ना अनेक गोष्टी मुलांना अनुभवातून, व्यवहारातून शिकता येतात.

शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक, अनुताई वाघ, सिंधुताई आंबिके यांनी तर लहान आदिवासी मुलांना समजून घेऊन त्यांना शिकवले. मुलांच्या परिचयातील आवडत्या वस्तूंच्या जसे बोरं, आवळे, चिकू, दगड, काठ्या, माती या वस्तूंच्या- मदतीने अध्यापन केले व ही छोटी मुले समजावून घेतली. या त्यांच्या कार्यामुळेच त्या आज बालशिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखल्या जातात. साधे गणित आहे- चांगले शिक्षक व्हायचे असेल, तर विषयाचे ज्ञान हवेच; परंतु मूल समजून घेऊन शिकवले, तर आपण चांगले शिक्षक बनू, आवडते शिक्षक बनू. आवडत्या शिक्षकाने कोणताही विषय शिकवला, तर तो मुलांना आवडतोच आणि मुलं आनंदाने शिकतात. म्हणून आपण प्रथम मुलांना समजून घेऊन आवडते शिक्षक बनू या!

***

# लर्निंग होम येथे भव्य शैक्षणिक प्रदर्शन







दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी १७ ते १९ फेब्रुवारी २०१७ ग्राममंगल लर्निंग होममध्ये शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रकल्प पद्धतीने रचनावादी शिक्षण हा या प्रदर्शनाचा पाया असल्याने गेल्या वर्षात नेहमीप्रमाणेच तीन प्रकल्पांवर विद्यार्थ्यांचे काम घेण्यात आले ते प्रकल्प विषय पुढील प्रमाणे आहेत.

१. दागिने २. खेळ ३. वाहतूक

बालवाडी ते गट ८ पर्यंतच्या सर्व मुले या प्रदर्शनात सहभागी झाली होती. प्रत्येक वर्षी विषयाशी संबंधित व्यक्ती प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्याचा लर्निंग होमचा प्रघात आहे त्यानुसार खेळ प्रकल्प असल्याने मा. मृणालिनी कुंटे यांना निमंत्रित केले होते.

१७ तारखेला सकाळी ठीक १० वाजता या प्रदर्शनाचे उद्घाटन मृणालिनी कुंटे यांनी केले. त्यांनी मुलांशी व पालकांशी संवाद साधला. यामध्ये त्यांनी त्यांच्या आयुष्यातील विविध अनुभवांचे वर्णन केले. त्याचप्रमाणे मुलाकडून नको त्या वयात अवाजवी अपेक्षा ठेवू नका असा सल्ला देण्याबरोबरच अभ्यासाइतकेच खेळालाही महत्त्व द्यावे असे मत व्यक्त केले.

लर्निंग होमच्या विद्यार्थ्यांनी लर्निंग होमच्या दृष्टीकोनातून आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून प्रदर्शनाचे काय महत्त्व आहे ते नमूद केले.

या प्रदर्शनाला जाणकारांचा उत्तम प्रतिसाद लाभला. प्रदर्शनात साधारण विविध विषयांचे २५० तक्ते, आणि पन्नासहून अधिक वैविध्यपूर्ण शैक्षणिक साधने मांडली गेली होती . प्रदर्शनाचे सर्वाधिक मोठे वैशिष्ट्य हे की हे सर्व तक्ते आणि साधने मुलांनी स्वत: आत्मविश्वासाने प्रदर्शनास आलेल्या लोकांना स्पष्ट करून सांगितली

***


## प्रकाशकाचे निवेदन

रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर (सेंट्रल) रूल्स, १८५६, नियम (३) अनुसार ग्राममंगल शिक्षणवेध मासिकासंबंधी प्रतिवर्षी फेब्रुवारीनंतर प्रथम प्रकाशित होणाऱ्या अंकात करावयाचे निवेदन :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | मुंबई |
| २) | नियतकाल | : | मासिक |
| ३) | मुद्रक व प्रकाशकाचे नाव | : | अजित मंडलिक |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ |
| ४) | मुद्रण स्थळ | : | मुंबई |
| ५) | संपादकाचे नाव | : | प्रा. रमेश पानसे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | २०२, नॉवेल्टी क्लासिक, राज मोटर्सच्या मागे, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६. |
| ६) | मालकाचे नाव | : | ग्राममंगल |
| ७) | पत्ता | : | गांधी भवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११ ०३८ |

मी असे जाहीर करतो की वरील निवेदन माझ्या माहितीनुसार आणि समजुतीनुसार खरे आहे.
अजित मंडलिक - मुद्रक-प्रकाशक

**नवा विचार**

सोमनाथ वाळके

# ‘सर, मी जात खोडली !’

शाळेच्या नव्या वर्षाच्या पहिल्याच कार्यदिनी वर्गात पाऊल ठेवले. मुलांनी गर्दी करून नववर्षाच्या शुभेच्छा, ग्रीटिंग कार्ड्स दिली. शुभेच्छांच्या या देवघेवीनंतर विद्यार्थी हजेरी हातात घेतली, हजेरी घ्यायला सुरुवात केली. हजेरी क्रमांक १३ पाहताना अचानक लक्ष गेले तर... हजेरीचे दोन रकाने निळ्या शाईपेनने खोडलेले! काही लक्षात येईना- कोणी केला असावा हा वाह्यातपणा? थोड्या मोठ्याच आवाजात विचारले,

‘‘हजेरी कोणी घेतली होती रे?’’

‘‘सर, रोहनने.’’

मी पाहिले- रोहन कावराबावरा होऊन आणि थोडासा घाबरलेल्या अवस्थेत माझ्याकडे पाहत होता.

‘‘रोहन, तू हजेरी घेतली होतीस?’’ मी विचारले.

‘‘होय सर.’’ रोहन खालच्या आवाजात म्हणाला.

‘‘तुझ्या नावापुढे स्केचपेनने कोणी खाडाखोड केलीय?’’ मी मोठ्या आवाजात विचारले.

‘‘मीच केली आहे सर.’’ शांत परंतु खंबीर आवाजात रोहनने उत्तर दिले. बहुधा होणाऱ्या परिणामांना सामोरे जाण्याची त्याची तयारी असावी.

आता मात्र मला कुतूहल वाटले- रोहनने असे का केले असावे?

‘‘पण तू हे का केलेस बाळ?’’ मी शांत आणि कुतूहलमिश्रित स्वरात विचारले.

‘‘सर, तुम्हीच नेहमी सांगता की- पृथ्वीवर फक्त एकच जात आणि धर्म आहे, तो म्हणजे माणूस. प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्याशी एक माणूस म्हणून वागले पाहिजे. प्रत्येकाने स्वतःची किंवा इतरांची जात किंवा धर्म न पाहता काम केले पाहिजे. जगात समानता

आणली पाहिजे, स्वतःच्या मनातून जात काढून टाकली पाहिजे. मग आमची जात आणि धर्म हजेरीवर का लिहिलेले असते? नीट पाहा सर, मी माझा धर्म आणि जात खोडली आहे,'' रोहन सांगत होता, मी ऐकत होतो. आता सर काय म्हणतील याची उत्सुकता वर्ग ताणून होता.

''रोहन, आय ॲम प्राऊड ऑफ यू!''

माझ्या चेहऱ्यावर स्मितहास्य आणि डोळ्यांत अश्रू तरळले. अनेक दिवसांपासून जे पेरतो आहे, ते उगवायला लागले आहे याचे समाधान मनाला प्रचंड आनंद देऊन गेले.

''रोहन, तुझ्या या कृतीने मला झालेला आनंद मी शब्दांत सांगू शकत नाही... खरंच, तुझ्या कृतीतून तू सर्वांना एक वस्तुपाठ घालून दिला आहेस! तुझा शिक्षक असल्याचा मला प्रचंड अभिमान वाटतो.'' मी भावनिक होऊन बोलत होतो.

वर्गात मुलांशी संवाद साधताना पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन घटनात्मक मूल्यांच्या बाबतीत वर्गात आमच्या नेहमी गप्पा होतात. समानता, धर्मनिरपेक्षता, मानवता, स्वातंत्र्य अशा अनेक मूल्यांची रुजवणूक या गप्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत होत असते. एक वेगळा दृष्टिकोन मुलांत आता रुजू लागलाय. सध्याच्या प्रचंड कलुषित झालेल्या वातावरणात आज घडलेल्या या सुखद प्रसंगाने मनात आशेची पालवी रुजविली आणि एक शिक्षक म्हणून मी योग्य मार्गाने जात आहे, याची जाणीव निर्माण करून दिली.

रोहनने आज फक्त हजेरी पटावरूनच नव्हे, तर आपल्या मनातून जात खोडून टाकलीये याचे मनाला असणारे समाधान वेगळेच आहे. सन २०१७ च्या वर्गातील पहिल्याच दिवशी घडलेला हा प्रसंग आयुष्याच्या पटलावर कोरून राहणार, हे नक्की.

चला, अशा अनेक रोहनच्या जाती आणि धर्म त्यांच्या मनातून पुसून टाकण्यासाठी पाऊल टाकू या... समतेच्या जगासाठी प्रयत्न करू या.

***

## शिक्षणवेधचा हा अंक तुम्हाला कसा वाटला?

**शिक्षणवेधविषयी तुमच्या अपेक्षा, सूचना, प्रतिक्रिया आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा. यासाठी तुम्ही** shikshanvedh@grammangal.org, **या मेलवर संपर्क साधू शकता. तसेच ९४२३५८०१४५ या भ्रमणध्वनीवर संदेश पाठवू शकता. आपल्या सूचनांचा आम्ही आवर्जून विचार करू. तसेच निवडक प्रतिक्रियांचा समावेश पुढील अंकातून करू.**

**शिक्षणवेधच्या फेसबुकवरही अवश्य भेट द्या.**